cmyk

धुलिवंदनाच्या सर्वांना... हार्दिक शुभेच्छा! –संपादक

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

○ पुणे ○ अहिल्यानगर ○ छत्रपती संभाजीनगर ○ जालना ○ धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–३०६ | मंगळवार दि.०३ मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### भारत–कॅनडामध्ये युरेनियम पुरवठ्याबाबत करार

नवी दिल्लीः भारत आणि कॅनडाने सोमवारी (दि. २ मार्च) युरेनियम पुरवठ्यातील सहकार्याबाबत ऐतिहासिक करार केला. कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी पहिल्यांदाच भारत दौऱ्यावर आले असता, येथे पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत त्यांची चर्चा झाली. या चर्चेनंतर दोन्ही देश लवकरच एक व्यापक आर्थिक भागीदारी कराराला अंतिम रूप देणार असल्याचा निर्णय घेण्यात आला. पंतप्रधान मोदी – कॅनडाचे पंतप्रधान कार्नी यांच्यातील चर्चेनंतर दोन्ही देशांनी अनेक करार केले, ज्यात महत्त्वाच्या खनिज क्षेत्रातील सहकार्याचा समावेश आहे. नागरी अणुऊर्जा क्षेत्रात आम्ही दीर्घकालीन युरेनियम पुरवठ्यासाठी एक महत्त्वाचा करार केला आहे. आम्ही लहान मॉड्यूलर अणुभट्ट्या आणि प्रगत अणुभट्ट्यांवर देखील एकत्र काम करू, असे पंतप्रधान मोदी यांनी संयुक्त निवेदनात म्हटले. या करारानुसार, कॅनडा भारताला युरेनियम पुरवणार आहे.

### मुंबईचा सरासरी हवा गुणवत्ता निर्देशांक शंभरीपार

मुंबई : सलग दोन दिवसांनंतर सरासरी हवा गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) शंभरीपार गेल्याने मुंबईवर पुन्हा एकदा प्रदूषणाचे ढग दाटू लागले आहेत. फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या दोन दिवसांत एक्यूआय हा प्रत्येकी ९४ इतका राहिला. हवा गुणवत्ता निर्देशांक शंभरीच्या आत आल्याने प्रदूषणात कमालीची घट झाली होती. मार्चमध्ये प्रदूषणाचा टक्का कमी राहण्याची शक्यता वाटत होती. मात्र, नव्या महिन्याच्या पहिल्याच दिवशी प्रदूषणात थोडी वाढ झाली. रविवारी ११८ इतक्या एक्यूआयची नोंद झाली. गेल्या चार दिवसांमधील हा दुसरा सर्वाधिक हवा गुणवत्ता निर्देशांक ठरला. हिरानंदानी गार्डन, पवई येथे (१४७) सर्वाधिक प्रदूषण आढळून आले. त्यानंतर मराठा कॉलनी, विलेपार्लेचा (१३९) नंबर लागला. सर्वात कमी प्रदूषण गावदेवीसह (५८) कन्नमवार नगर २, विक्रोळीमध्ये (७५) दिसून आले.

### कराडचे पर्यटक अडकलेल्या हॉटेलजवळ स्फोट

मुंबईः अमेरिका आणि इस्त्रायल यांनी २८ फेब्रुवारी २०२६ रोजी इराणवर मोठ्या प्रमाणात हल्ले केले, ज्यामध्ये इराणचे सर्वोच्च नेते आयतोल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला. या हल्ल्याला प्रत्युत्तर देत इराणने इस्त्रायलसह अमेरिकेच्या मित्र राष्ट्रांवर, विशेषतः (दुबई–अबू धाबी), कतार, बहरीन, कुवेत यांसारख्या गल्फ देशांवर क्षेपणास्त्रे, ड्रोन आणि रॉकेट हल्ले सुरू केले आहेत. या युद्धामुळे मध्य पूर्वातील हवाई क्षेत्र पूर्णपणे बंद झाले असून, जगातील सर्वाधिक व्यस्त दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळासह अबू धाबी, दोहा यांसारखे प्रमुख हब बंद पडले आहेत. सातारा जिल्ह्यातील कराड येथील एका विमा कंपनीतील २१ कर्मचारी सहलीसाठी दुबईला गेले होते. ते २५ फेब्रुवारी रोजी परतणार होते, पण युद्धामुळे विमाने रद्द झाल्याने अडकले आहेत. त्यांच्या हॉटेलजवळ स्फोट झाल्याने भीतीचे वातावरण आहे. हॉटेलमधून बाहेर पडण्यास मनाई असल्याने ते खोलीत बंदिस्त झाले आहेत.

### सुट्टीची सुचना

**आज मंगळवार, दि.०३ मार्च २०२६ रोजी धुलिवंदननिमित्त दै. राज्य लोकतंत्र कार्यालयास सूट्टी असल्यामुळे उद्या बुधवार दि.०४ मार्च २०२६ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही, याची वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी नोंद घ्यावी.**

**–व्यवस्थापक**

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२८ फेब्रुवारी २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६२.०० क्विंटल | २,००० | २,८५० | २,२४७ |
| ज्वारी/हायब्रिड: ६९.०० क्विंटल | २,००० | ४,७०० | ३,३४२ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : २०.५० क्विंटल | ६,५०० | ७,५९० | ७,२९७ |
| उडीद : ५.५० क्विंटल | ५,२०० | ५,२०० | ५,२०० |
| बाजरी: १२.०० क्विंटल | २,००० | २,९०० | २,५७७ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १४.५० क्विंटल | ५,२५० | ५,२५० | ५,२५० |
| हरभरा: ७.०० क्विंटल | ४,७९१ | ५,००१ | ४,८९६ |

# युद्धाचा शेतीवर घाला! निर्यात ठप्प; खते-इंधन महागण्याची भीती

## इराण–इस्त्राईल संघर्षाचा भारतीय कृषी बाजारावर परिणाम; बासमतीचे भाव दोन दिवसांत ६% घसरले

नवी दिल्ली । वृत्तसंस्था



**इराण–इस्त्राईल संघर्षात अमेरिका सहभागी झाल्यानंतर मध्यपूर्वेतील तणाव चिघळला असून त्याचा थेट फटका भारतीय शेती आणि कृषी निर्यातीला बसू लागला आहे. निर्यातीसाठी सज्ज असलेला तांदूळ, कांदा, फळे–भाजीपाला आणि मसाल्यांचा माल देशातील प्रमुख बंदरांवर अडकून पडला आहे. दुसरीकडे आयात खर्च वाढण्याच्या शक्यतेमुळे खते आणि इंधन महागण्याची भीती व्यक्त होत आहे.**

इराण हा भारताचा महत्त्वाचा व्यापारी भागीदार आहे. २०२५ मध्ये भारताने इराणला सुमारे १२० कोटी डॉलर्सची निर्यात केली होती. त्यामध्ये बासमती तांदळाचा सिंहाचा वाटा असून ७४.७ कोटी डॉलर्सची निर्यात झाली होती. केळी (६.१ कोटी डॉलर्स) आणि चहा पावडर (५.१ कोटी डॉलर्स) यांचाही मोठा समावेश होता. इराण हा भारतीय बासमतीचा सर्वात मोठा खरेदीदार देश मानला जातो. सध्याच्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे बासमती तांदळाचे दर अवघ्या दोन दिवसांत ६ टक्क्यांनी घसरले आहेत. व्यापाऱ्यांनुसार, संघर्ष लांबल्यास दरांवरील दबाव आणखी वाढू शकतो. इराणसह युएई, ओमान, येमेन आणि इराक या देशांत मोठ्या प्रमाणात बासमती, कांदा, फळे व भाजीपाल्याची निर्यात होते. सध्याच्या परिस्थितीत कंटेनर वाहतूक विस्कळीत झाली असून निर्यातदारांपुढे मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. पूर्व आशियाई देशांकडे होणारी सुमारे १५ टक्के निर्यातही ठप्प झाली आहे. ताजा भाजीपाला, फळे आणि हळदीसह मसाल्यांच्या खेपा रखडल्या आहेत. गेल्या दोन वर्षांत भारताची कडधान्य आयात ५० ते ६० लाख टनांदरम्यान पोहोचली आहे. हरभरा, तूर, उडीद, मसूर, पिवळा वाटाणा यासाठी म्यानमार, ▶▶ पान २ वर


> **खतांच्या किमती वाढीचा धोका**
>
> भारत मोठ्या प्रमाणात खतांची आयात हरमुझ सामुद्रधुनीमार्गे करतो. हा मार्ग विस्कळीत झाल्यास लांबच्या पर्यायी मार्गांचा अवलंब करावा लागेल, ज्यामुळे वाहतूक खर्च वाढणार आहे. इराण हा युरिया व अमोनियाचा मोठा उत्पादक देश असल्याने पुरवठा साखळी खंडित झाल्यास खतांच्या उत्पादन खर्चात ३० ते ४० टक्क्यांनी वाढ होऊ शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

# रविवारी नियुक्ती सोमवारी खात्मा?

## इराणचे अली रजा अराफी यांनाही मारले

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्ध आता जोरदार पेटले आहे. इस्रायल आणि अमेरिका मिळून इराणवर हल्ला करत आहेत. अनेक क्षेपणास्त्रं टाकली जात आहेत. इराणमधील प्रमुख शहरे निशाण्यावर आहेत. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांचा मृत्यू झाल्यानंतर लगेचच नव्या सर्वोच्च नेत्याच्या नावाची घोषणा करण्यात आली. सर्वोच्च नेते म्हणून अली रजा अराफी यांची निवड करण्यात आली. त्यांची नियुक्ती रविवारी करण्यात आली मात्र सोमवारी लगेचच त्यांना ठार करण्यात आले आहे.**



इराणमधील परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. अयातुल्ला अली खामेनेई यांच्यावर करण्यात आलेल्या हल्ल्यामध्ये त्यांच्या कुटुंबातील अनेकांचा जीव गेला. इराणचे सर्वोच्च नेते अली रजा अराफी यांनाही हल्ल्यात ठार करण्यात आल्याचा धक्कादायक दावा अमेरिकेने केला आहे. खरोखरच नव्या सर्वोच्च नेत्यालाही ठार केले का? हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. अमेरिकेच्या या दाव्यावर इराणकडून अजून कोणतेही उत्तर देण्यात आलेले नाही. उलट आपली लष्करी ताकद दाखवणारा ▶▶ पान २ वर

> **इराणकडून सर्वात मोठ्या तेल रिफायनरीवर हल्ला**
>
> इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई ठार झाल्यानंतर, इराण प्रचंड संतापला आहे. त्याने आपल्या हल्ल्यांची तीव्रता आणखीनच वाढवल्याचे दिसत आहे. इराणच्या हल्ल्याने संपूर्ण मध्यपूर्वेत युद्धाचा भडका उडाला आहे. इराणने २४ तासांत १५ हून अधिक देशांमधील अमेरिकन लष्करी तळांना लक्ष्य केल्याचा दावा केला आहे. इराणने आता सौदी अरेबियातील जगातील सर्वात मोठी तेल रिफायनरी 'अरामको'वरही हल्ला केल्याचे वृत्त आहे. आता हे युद्ध थांबावे, अशी अमेरिका आणि इस्त्रायलची इच्छा आहे. मात्र, इराणचा बदला अद्याप बाकी आहे. यासंदर्भात आपण अमेरिकेशी कसल्याही प्रकारची चर्चा करणार नाही, असे इराणने स्पष्ट केले आहे.

# मध्यपूर्वेतील संघर्षावर पंतप्रधान नरेंद्र मोदींची तातडीची बैठक

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**इस्त्रायल, अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाच्या सुरक्षा समितीची (सीसीएस) महत्त्वाची बैठक पार पडली. पंतप्रधानांच्या दिल्लीस्थित निवासस्थानी ही बैठक पार पडली. या बैठकीला संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन उपस्थित होत्या.**



सूत्रांच्या माहितीनुसार, पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षामुळे उद्भवलेल्या जागतिक परिस्थितीचा सविस्तर आढावा या बैठकीत घेण्यात आला. विशेषतः या घडामोडींचा भारताच्या सुरक्षेवर, ऊर्जा पुरवठ्यावर, अर्थव्यवस्थेवर आणि परराष्ट्र संबंधांवर होणाऱ्या संभाव्य परिणामांवर चर्चा करण्यात आली. तसेच, परदेशात अडकलेल्या भारतीय नागरिकांना सुरक्षित परत आणण्याच्या उपाययोजनांवरही विचारविनिमय झाल्याचे समजते. संबंधित ▶▶ पान २ वर

# व्हिएसआरचा मालक रोहित सिंहला अटक करा

## अन्यथा राष्ट्रवादी लढा उभारेल

मुंबई । प्रतिनिधी

राज्याचे दिवंगत उमुख्यमंत्री अजित पवारांच्या विमानाला २८ जानेवारीला अपघात झाला. या घटनेच्या १ महिन्यानंतर विमान अपघाताचा प्राथमिक अहवाल समोर आला आहे. यामध्ये सुरुवातीला विमान झाडावर आदळलं. त्यानंतर जमिनीवर कोसळल्याचं सांगण्यात आलं आहे. दरम्यान, या अहवालानंतर अजित पवार यांचे पुत्र जय पवार यांनी एक धक्कादायक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे.



यामध्ये व्हिएसआरचे मालक रोहित सिंह मुख्य पायलटच्या सीटवर उड्डाणादरम्यान झोपलेले असल्याचा दावा जय पवार यांनी केला आहे. यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. रोहित सिंहला अटक करा अशी मागणी मिटकरींनी केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि अजित पवार यांचे पुत्र जय पवार यांनी रविवारी व्हीएसआर व्हेंचर्सचे मालक रोहित सिंग यांच्या संदर्भातला एक व्हिडिओ ▶▶ पान २ वर

# कृषी विभागातील घोटाळा प्रकरणात धनंजय मुंडेंना पुन्हा दिलासा; अंजली दमानियांना धक्का



मुंबई । प्रतिनिधी

**कृषी विभागातील कथित घोटाळा प्रकरणात राष्ट्रवादीचे नेते आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांना पुन्हा एकदा दिलासा मिळाला आहे. मुंबई उच्च न्यायालय यांच्याकडून आधीच क्लिन चिट मिळाल्यानंतर आता लोकायुक्तांनीही त्यांच्याविरोधातील तक्रार फेटाळून लावली आहे. त्यामुळे सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांना मोठा धक्का बसला आहे.**

२०२४ मधील कृषी विभागातील खरेदी–विक्री व्यवहारांप्रकरणी जुलै २०२५ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने मुंडे यांना दिलासा दिला होता. संबंधित व्यवहारांमध्ये त्यांचा थेट सहभाग नसल्याचे न्यायालयाने नमूद केले होते. या निर्णयाविरोधात अंजली दमानिया यांनी लोकायुक्तांकडे तक्रार दाखल केली होती. लोकायुक्तांनी आपल्या आदेशात स्पष्ट केले की, उच्च न्यायालयाचा आदेश ▶▶ पान २ वर

> **महाजेनकोच्या ४० तक्रारींचा उल्लेख**
>
> तक्रारीत महाजेनको यांनी बीड येथील पोलिसांकडे दाखल केलेल्या ४० तक्रारींचा उल्लेख करण्यात आला होता. मात्र संबंधित एफआयआरप्रकरणी लोकायुक्तांना चौकशीचा अधिकार नसून, आवश्यक असल्यास दंडाधिकारी न्यायालयात स्वतंत्र खाजगी तक्रार दाखल करता येईल, असा पर्याय आदेशात नमूद करण्यात आला.



# युद्धामुळे पर्यटन व्यवसाय संकटात महाराष्ट्रात ९९ टक्के बुकिंग रद्द

मुंबई । प्रतिनिधी

इस्त्रायल–इराण युद्धाने गंभीर स्वरूप घेतल्याने जगभरातील विमान सेवा विस्कळीत झाली आहे. याचा परिणाम महाराष्ट्राच्या पर्यटन व्यवसायावर झाला असून, ९९ टक्के बुकिंग रद्द झाली आहे. दुबईसह आखाती देशांत अनेक भारतीय नागरिक अडकले असून, त्यांच्या कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे पर्यटन उद्योग पूर्णपणे कोलमडला आहे.

इस्त्रायलने इराणवर हल्ला केल्यानंतर अमेरिकेनेही इराणवर हल्ला चढवला आहे. या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनेई मारले गेले आहेत. त्यामुळे इराणचा संतापाचा पारा ▶▶ पान २ वर

# माजी खा.डॉ.जनार्धन वाघमारे यांचे निधन

लातूर । प्रतिनिधी



'लातूर पॅटर्न'चे जनक माजी खासदार, माजी कुलगुरू थोर विचारवंत डॉ. जनार्धन वाघमारे यांचे दि. २ मार्च रोजी सकाळी ८.३० वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर त्यांचे मुळगाव कवठा ता. औसा जिल्हा लातूर येथे ३ मार्च २०२६ सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या निधनाने शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील एक बहुआयामी व प्रेरणादायी व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. त्यांच्या जाण्याने लातूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्राच्या वैचारिक विश्वाची अपरिमित हानी झाली आहे, अशी भावना असंख्य मान्यवरांनी व्यक्त केली. ▶▶ पान २ वर

# समाजकल्याण वसतिगृहांच्या नावांमधील 'मागासवर्गीय' शब्द हटवला

## महाराष्ट्र सरकारचा मोठा निर्णय; महापुरुषांची नावे मात्र कायम राहणार

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्र सरकारने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत चालवल्या जाणाऱ्या शासकीय वसतिगृहांच्या नावांमध्ये महत्त्वपूर्ण बदल केला आहे. राज्यातील मागासवर्गीय मुला–मुलींच्या शिक्षणासाठी चालवल्या जाणाऱ्या वसतिगृहांच्या नावांमधून 'मागासवर्गीय' हा शब्द काढून टाकण्याचा क्रांतीकारी निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतचा शासन आदेशही जारी करण्यात आला आहे.**




राज्यात सध्या सामाजिक न्याय विभागांतर्गत एकूण ४४९ शासकीय वसतिगृहे चालवली जातात. यापैकी बहुतेक वसतिगृहांना 'मागासवर्गीय मुला/मुलींचे वसतिगृह' अशी नावे देण्यात आली आहेत. फक्त काही मोजक्या वसतिगृहांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत तुकाराम, संत सखुबाई, संत रामदास, संत गाडगे महाराज यांसारख्या महापुरुषांची नावे आहेत. शासन निर्णयानुसार, 'मागासवर्गीय' हा शब्द समाजातील उपेक्षित आणि शोषित घटकांसाठी वापरला जातो. या शब्दामुळे समाजातील विषमता आणि शोषण अधोरेखित होते. यामुळे या वसतिगृहांची ओळख 'मागासवर्गीयांसाठीची संस्था' अशी निर्माण होते आणि समाजाचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोनही नकारात्मक राहतो. या पार्श्वभूमीवर सरकारने हे नाव बदलण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, ४४९ वसतिगृहांपैकी ४१६ वसतिगृहांचे नामांतर करण्यास मान्यता देण्यात आली आहे. ज्या वसतिगृहांना आधीच महापुरुषांची नावे देण्यात आली आहेत, ती नावे कायम ठेवण्यात ▶▶ पान २ वर

> **नवीन नामकरणाची रचना पुढीलप्रमाणे**
>
> सर्व मुलांच्या वसतिगृहांना 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह' असे नाव देण्यात येणार आहे. सर्व मुलींच्या वसतिगृहांना 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह' असे नाव देण्यात येणार आहे. फक्त सातारा येथील एका मुलींच्या वसतिगृहाला 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शासकीय वसतिगृह' हे नाव देण्यात आले आहे.

cmyk

अग्रलेख

# जागतिक अस्थैर्य धोकादायक

जगाच्या राजकारणात युद्धाची भाषा कधीच नवी नाही. मात्र अलीकडच्या काळात ती अधिक आक्रमक, थेट आणि चिंताजनक होत चालली आहे. इस्रायल–इराण संघर्ष आणि पाकिस्तान–अफगाणिस्तान सीमेवरील तणाव या दोन स्वतंत्र वाटणाऱ्या घडामोडी प्रत्यक्षात एकाच जागतिक प्रवृत्तीचं प्रतिबिंब आहेत. संयम संपविलेले आणि नसलेली शक्ती फुगवून दाखवून त्याद्वारे प्रश्न सोडवण्याची फुशारकी मारणारे लोक सत्तेवर बसल्याने त्यांच्या कृतीची जगाला चिंता लागली आहे. इस्रायलने इराणविरुद्ध 'प्री-एम्प्टिव्ह अटॅक' जाहीर केला आहे, तर पाकिस्तानने अफगाणिस्तानच्या राजधानी काबूलसह कंधार, पक्तिया या प्रमुख शहरांवर हवाई हल्ले केले आहेत. दोन्ही ठिकाणी 'ओपन वॉर' आणि 'मेजर कॉम्बॅट ऑपरेशन्स' अशा भाषा वापरल्या जात आहेत. ही भाषा केवळ दोन प्रदेशांची नाही, तर संपूर्ण जगाची स्थिरता धोक्यात आणणारी आहे.

इस्रायलने इराणविरोधात 'प्री-एम्प्टिव्ह अटॅक' केल्याची घोषणा करून एक गंभीर आंतरराष्ट्रीय प्रश्न उभा केला आहे. 'आपल्यावर हल्ला होणार आहे' या शक्यतेवर आधारित आधीच हल्ला करणं, ही संकल्पना आंतरराष्ट्रीय कायद्याच्या चौकटीत कायमच वादग्रस्त राहिली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर व्हिडिओ प्रसिद्ध करून 'मेजर कॉम्बॅट ऑपरेशन्स' सुरू झाल्याची घोषणा केली. जून २०२५ मधील १२ दिवसांच्या युद्धानंतर आलेली शस्त्रसंधी तात्पुरती ठरली, हे आता स्पष्ट झाले आहे. तेव्हा इस्रायल आणि अमेरिकेने इराणच्या अणुकार्यक्रमाच्या तीन प्रमुख केंद्रांवर हल्ले केले होते. आता थेट कारवाई सुरू झाली आहे. गेल्या तीन दशकांपासून इराण आणि इस्रायल यांच्यात थेट युद्ध झालेलं नसतानाही छुप्या लढाया, सायबर हल्ले, गुप्त कारवाया सातत्याने सुरू आहेत. इराणच्या प्रॉक्सी गटांद्वारे (हिजबुल्लाह, हमास) इस्रायलला घेरण्याचा प्रयत्न आणि इस्रायलचा त्याविरोधातील प्रतिहल्ला ही सलग चक्रे आता थेट युद्धात रूपांतरित झाली आहेत. प्री-एम्प्टिव्ह हल्ल्यांची सगळ्यात मोठी जोखीम म्हणजे गैरसमज. एखादा देश भविष्यातील संभाव्य हल्ल्याच्या अंदाजावर कारवाई करतो, तेव्हा तो अंदाज चुकीचा ठरल्यास त्याचे परिणाम संपूर्ण प्रदेशाला भोगावे लागतात. मध्य पूर्व आधीच अस्थिर असताना, इस्रायल-इराण संघर्ष उघड युद्धात रूपांतरित झाल्याने त्याचे पडसाद जागतिक अर्थव्यवस्था, तेल बाजार आणि आंतरराष्ट्रीय राजकारणावर उमटल्याशिवाय राहणार नाहीत. तेलाच्या किमती आधीच वाढत आहेत. पर्शियन गल्फमध्ये युद्ध वाढलं तर जगभरात इंधन संकट, महागाई आणि मंदीचे सावट येईल. युरोप, आशिया, आफ्रिका असा सर्वत्र प्रभाव पडेल. शिवाय, इराणचे प्रॉक्सी गट (इराक, सीरिया, येमेन) सक्रिय होतील. एक छोटासा गैरसमज संपूर्ण प्रदेशाला आगीत लोटू शकतो. दुसरीकडे, दक्षिण आणि मध्य आशियातही तणाव वाढत आहे. तिकडे पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी 'आमचा संयम संपला, आता उघड युद्ध' अशी भाषा वापरली. पाकिस्तानने ३७ ठिकाणांवर हल्ले करून शेकडो तालिबानी सैनिक ठार केल्याचा दावा केला, तर तालिबानने पाकिस्तानी चौक्यांवरील हल्ल्यात ५५ सैनिक ठार झाल्याचे सांगितले. अफगाणिस्तानमधील तालिबान सरकारने नागरी वस्ती, मदरसा, महिला आणि लहान मुलांवर हल्ले झाल्याचे आरोप केले. युनायटेड नेशन्सनेही पूर्वीच्या हल्ल्यांत नागरी जीवितहानीची पुष्टी केली आहे. या परस्परविरोधी दाव्यांमधून विश्वासाचा पूर्ण अभाव दिसून येतो. दोन्ही देशांच्या सीमा (डुरंड लाइन) २६०० किलोमीटर लांब, डोंगरदऱ्या, वाळवंट यावर नियंत्रण कठीण आहे. तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान (टीटीपी) सारखे गट अफगाणिस्तानात आश्रय घेतात, असे पाकिस्तानचे आरोप. तालिबान मात्र पाकिस्तानला 'दहशतवादाला प्रोत्साहन' देणारा म्हणतो. हा संघर्ष केवळ लष्करी न राहता मानवी संकटात रूपांतरित होतो आहे. लाखो नागरिक विस्थापित होण्याची भीती, शाळा-मदरसे बंद, अर्थव्यवस्था ठप्प. अर्थात दोन्हीकडचे नादान सत्ताधारी मानवता आणि आधुनिक जगाची 'जगा आणि जगू द्या' ही भाषा न समजणारे टोळीवाल्यांच्या न्यायचेच समर्थक आहेत. अनेकांनी प्रयत्न करूनही ते तिथला समाज मध्ययुगात कसा राहील याकडे लक्ष देणारे आहेत. अशावेळी या संघर्षात महासत्तांचा सहभाग परिस्थिती अधिक गुंतागुंतीची करतो आहे हे विशेष.

प्रश्न असा आहे की, अमेरिकेचा हा हस्तक्षेप खरोखरच शांततेसाठी आहेत का, की भूराजकीय प्रभाव वाढवण्यासाठी? इतिहास सांगतो की, अशा संघर्षात बाह्य हस्तक्षेप अनेकदा तात्पुरता तोडगा देतो, पण दीर्घकालीन अस्थैर्य वाढवतो. १९७९ च्या सोव्हिएत-अफगाण युद्धापासून ते आजपर्यंत, बाह्य शक्तींच्या हस्तक्षेपाने प्रदेश अधिक अस्थिर झाला. आज इस्रायल-इराण असो वा पाकिस्तान-अफगाणिस्तान, दोन्ही ठिकाणी एक समान धागा दिसतो तो सुरक्षेच्या नावाखाली आक्रमकता. प्रत्येक देश आपली कारवाई 'संरक्षणात्मक' असल्याचे सांगतो, पण त्याचे परिणाम सामान्य नागरिकांना भोगावे लागतात. स्फोटांचे आवाज, हवाई हल्ल्यांचे सायरन, रात्री हादरलेली घरं, गमावलेले जीव, युद्धाने निर्माण झालेली भीती ही कोणत्याही धोरणाची किंमत असू शकत नाही. मध्य पूर्वेत तेल उत्पादन थांबले, तर जगभर महागाई वाढणार आणि त्याचे दुरगामी परिणाम होतील. व्यापार मार्ग, ऊर्जा पुरवठा, मानवी स्थलांतर आणि सर्व घटक प्रभावित होतील. आण्विक क्षमता असलेल्या देशांमध्ये एक छोटी चूक जागतिक युद्ध घडवू शकते.

## राजमाता मार्गदर्शन केंद्राची केंद्रिय सैनिक विद्यालय प्रवेशपूर्व परिक्षेत उत्तुंग भरारी

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तेचे प्रवेशव्दार असणाऱ्या येथील राजमाता मार्गदर्शन केंद्राच्या विद्यार्थ्यांनी केंद्रिय सैनिक विद्यालय प्रवेश पूर्व परिक्षेत नेत्रदिपक असे सुवर्ण यश मिळवले असून गुणवत्तेत उत्तुंग भरारी घेत वडवणी सारख्या ग्रामीण भागातून देखील पाच पेक्षा जास्त विद्यार्थी दोनशेहून अधिक पुन्हा गुणांनी या परिक्षेत उत्तीर्ण झालेले आहेत. या विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करणारे त्यांचे मार्गदर्शक अंगद मद्देवाड सर व पवन आरसेवाड सर यांचे व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

मागील अनेक वर्षांपासून वडवणी शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धात्मक मार्गदर्शनासाठी नेहमी एक आशेचा किरण व गुणवत्तेचे प्रवेशव्दार असलेल्या येथील राजमाता मार्गदर्शन केंद्राच्या शिरपेच्यात पुन्हा एकदा मानाचा तुरा रोवला गेला आहे. इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, नवोदय, त्याचप्रमाणे केंद्रिय सैनिक विद्यालय प्रवेशपूर्व परिक्षेची तयारी या मार्गदर्शन केंद्राच्या माध्यमातून व अंगद मद्देवाड सर व पवन आरसेवाड सर सर या दोन्ही मार्गदर्शकांच्या अथक परिश्रमातून करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनीही त्यांच्या स्वप्नांना व अपेक्षांना उत्तम अशा निकालातून वेळोवेळी एक प्रकारे बळ देण्याचे काम केलेले आहे, व ते करतही आहेत. नुकत्याच जानेवारी महिन्यात संपन्न झालेल्या केंद्रिय सैनिक विद्यालय प्रवेशपूर्व परिक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला असून या निकालात राजमाता मार्गदर्शन केंद्राचे चि.अथर्व बंडू नागरगोजे याने ३०० गुणांपैकी तब्बल २८४ गुण, चि.राजवीर बाळासाहेब घुगे याने २६८ गुण, कु.तनिष्का उध्दव बडे हिने २५९ गुण, कु.स्वानंदी बाबु गवळी हिने २१६ गुण, कु.मनवा ज्ञानेश्वर वाव्हळ हिने २०६ गुण मिळवून ते तसेच इतरही अनेक विद्यार्थी प्रवेशास पात्र झाले आहेत. विशेष म्हणजे चि.अथर्व बंडू नागरगोजे याने ३०० गुणांपैकी तब्बल २८४ गुण मिळवत संपूर्ण भारत देशातून या परिक्षेत १६८ वा क्रमांक पटकाविण्याचा पराक्रम केला आहे. दरम्यान इयत्ता सहावी प्रवेशासाठी ही परिक्षा आयोजित करण्यात आलेली होती. अतिशय अवघड प्रश्नांचा या परिक्षेत समावेश असतो. संपूर्ण पेपरची काठिन्यपातळी अधिक असते तसेच ग्रुपिंग मध्येही या परिक्षेत किमान गुण घेणारे विद्यार्थीच प्रवेशासाठी पात्र ठरतात. मात्र या मार्गदर्शन केंद्राच्या विद्यार्थ्यांनी एकप्रकारे अतिशय अवघड असलेला हा डोंगर सहजरित्या सर केलेला आहे. परिक्षेतील या यशाबध्दल सर्व विद्यार्थ्यांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणारे अंगद मद्देवाड सर व पवन आरसेवाड सर यांचे पालक व शिक्षणप्रेमी नागरिकांतून अभिनंदन व कौतुक केले जात आहे.

## समाजाला सन्मार्गाला लावण्याचे कार्य संत भगवानबाबांनी केले-महंत भगवान महाराज राजपुत



बीड । प्रतिनिधी

**संत भगवानबाबांनी सर्व जाती, धर्मातील लोकांना एकत्र करून परमार्थ वाढविला. अध्यात्माबरोबरच सामाजिक सुधारणा करून अनिष्ट रूढी, परंपरा बंद केल्या. समाजाला सन्मार्गाला लावण्याचे कार्य संत भगवानबाबांनी केले, असे प्रतिपादन राजा हरिश्चंद्र संस्थांचे महंत भगवान महाराज राजपुत यांनी केले.**

बीड येथील श्रीसंत भगवानबाबा सप्ताह समितीच्या वतीने आयोजित सर्वधर्म समभाव अखंड हरिनाम सप्ताहाच्या काल्याच्या कीर्तनात ह.भ.प. भगवान महाराज राजपुत बोलत होते. या प्रसंगी ' उपजोनिया पुढती येऊ । काला खाऊ दहीभात ।। वैकुंठी तो ऐसे नाही । कवळ काही काल्याची ।।एकमेका देऊ मुखी । सुखी घालून उंबरी । तुका म्हणे वाळवंट ।। बरवे नीट उत्तम' संत तुकाराम महाराज यांच्या अभंगावर त्यांनी भाविकांच्या मनाला भिडणारे आणि तल्लीन करणारे निरुपण केले. काल्याच्या कीर्तनात त्यांनी 'श्रीकृष्णाच्या विविध लीला, कार्य याविषयी विवेचन केले'. अध्यात्माबरोबरच सामाजिक परिस्थितीवर राजपुत महाराज यांनी त्यांनी विविध दृष्टांत देऊन सामाजिक भाष्य केले. श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून ज्ञानदान, अन्नदान आणि सामाजिक कार्य होते. सर्वधर्म समभाव या न्यायाने हे भगवानबाबा प्रतिष्ठान म्हणजे संतश्रेष्ठ भगवानबाबांच्या कार्याप्रमाणे चालणारे संस्थान आहे. बाबांनी त्या काळामध्ये सर्व जाती धर्माचे पंथांचे लोक एकत्र करून परमार्थ वाढवला. काल्याचे महत्त्व सांगत असताना राजपुत महाराज म्हणाले, पहिला काला भगवंताने गोकुळात केला. दुसरा काला ज्ञानेश्वर माऊलींनी वाळवंटात केला. आणि तिसरा काला साधु संतांनी, भगवान बाबा सारखे सर्व संतांनी जो काला केला तो आज पर्यंत वारकरी संप्रदाय करत आहे. ज्यामध्ये ज्ञानदान अन्नदान व साधुसंतांचे विचार, व्यक्ती निर्माण, कुटुंब निर्माण, व समाज निर्माण असे कार्य करत असल्याचे सांगितले. गायनाचार्य म्हणून अंगद म. सोनवणे, बंडू म. जटाळ, अंगद म. मोरे, शेळके महाराज, मुंडे महाराज, श्रीराम म. सानप आदी सहभागी होते. मृदुंगाचार्य ज्ञानेश्वर माऊली तांदळे, विणेकरी वाल्मीक म. चाटे, रामनाथ म. खेडकर आदींची उपस्थिती होती. यावेळी कीर्तनकार महंत ह.भ.प. भगवान महाराज राजपुत उपस्थित महाराज व पुजारी, सेवेकरी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी खरमाटे महाराज, मुंडे महाराज, स्वामी शिवरुद्रानंद महाराज, बाजीराव खेडकर, प्रा.आर. टी.गर्जे, प्राचार्य दत्तात्रय आघाव, डॉ. अमोल लहाने, नाना सानप, नारायण नागरे, इंजी. पांडुरंग तोंडे, एन.बी. चौरे, सुधाकर सानप, घोळवे सर, चौरे, आदींसह भाविकांची मोठी उपस्थिती होती.

## आदोडे यांचा राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार देऊन सन्मान

परळी। प्रतिनिधी

**येथील सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक भैय्यासाहेब आदोडे यांचा जेष्ठ विचारवंत व ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते समाज रत्न पुरस्कार देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले.**



समाजप्रबोधन, स्वच्छता आणि समतेचा अखंड संदेश देणारे राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त परळी येथे भव्य सुवर्ण शतकोत्तर महोत्सवी वर्ष सोहळा दि.२३ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाला.संत गाडगेबाबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था परळी आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षपद ज्येष्ठ साहित्यिक व ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीपाल सबनीस यांनी भूषविले. उद्घाटक म्हणून समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कीर्तनकार ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिर येथे करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रसंत गाडगेबाबा राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार सामाजिक कार्यात शिक्षण क्षेत्रात योगदान दिल्याबद्दल भैय्यासाहेब आदोडे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.फुले , शाहू, आंबेडकर चळवळीत सक्रिय असणारे भैय्यासाहेब आदोडे सर हे परळी शहरातील विविध सामाजिक व सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रमात सहभागी असतात.त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.परळी ,रमेश सोनाळे नांदेड, प्रा.डॉ. किशोर वाघ संभाजीनगर, अरविंद कांबळे संभाजीनगर, मनोहर व्हावळे गंगाखेड, पंडित जिंजुर्डे परळी, अनंत इंगळे परळी, जयवर्धन सूर्यवंशी परळी यांना समाज रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रस्ताविकपर भाषणात कार्यक्रमाचे आयोजक पृथ्वी शिंदे यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदर्श शिक्षक लक्ष्मण वैराळ यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संयोजक पृथ्वी शिंदे तसेच निमंत्रक सुशिल पोटभरे, रोहित झिंजुर्डे, विकास वाघमारे, राहुल सूर्यवंशी, विशाल डोंबे, महेश मुंडे आदींनी परिश्रम घेतले.

# पान १ वरून...

### युद्धाचा शेतीवर घाला! निर्यात ठप्प;

कॅनडा आणि आफ्रिकन देशांवर अवलंबून राहावे लागते. युद्धामुळे समुद्री वाहतुकीचा खर्च वाढल्यास आयातीत कडधान्य महाग होण्याची शक्यता आहे. तज्ज्ञांच्या मते, आयात महागल्यास देशांतर्गत कडधान्य उत्पादकांना आधार मिळू शकतो; मात्र भाव जास्त वाढल्यास महागाई नियंत्रणासाठी सरकार हस्तक्षेप करू शकते, अशीही शक्यता आहे. इंधन दरवाढीचाही थेट परिणाम शेतीच्या उत्पादन खर्चावर होणार आहे. युद्ध किती काळ चालेल, यावर शेतीमालाच्या बाजारभावांचे भवितव्य अवलंबून आहे. मात्र सध्याच्या घडीला निर्यातदार, शेतकरी आणि खत उद्योग यांच्यासमोर अनिश्चिततेचे मोठे सावट दाटले आहे.

----------

### मध्यपूर्वेतील संघर्षावर पंतप्रधान

मंत्रालये आणि यंत्रणांना आवश्यक ती तयारी ठेवण्याबाबत सूचनाही देण्यात आल्याची माहिती आहे. केंद्र सरकार परिस्थितीवर लक्ष ठेवून असून भारतीय नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असा स्पष्ट संदेश या बैठकीतून देण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. इस्रायल, अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युएईचे राष्ट्राध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांच्याशी संवाद साधला. याबाबत सोशल मीडियावर माहिती देत पंतप्रधान म्हणाले की, यूएईच्या राष्ट्राध्यक्षांशी माझी दूरध्वनीवर चर्चा झाली. यावेळी यूएईवरील हल्ल्यांचा तीव्र निषेध केला आणि या हल्ल्यांत मृत्यूमुखी पडलेल्यांप्रती शोक व्यक्त केला. या कठीण काळात भारत यूएईसोबत उभा आहे. यूएईमध्ये राहणाऱ्या भारतीय समुदायाची काळजी घेतल्याबद्दल त्यांचे आभार मानले. तणाव कमी करणे, प्रादेशिक शांतता, सुरक्षा आणि स्थैर्य यांना आम्ही पाठिंबा देतो, असेही ते म्हणाले.

--------------

### रविवारी नियुक्ती सोमवारी

व्हीडीओ त्यांनी शेअर केला. इराणी लोक सरकारच्या समर्थनार्थ रस्त्यावर उतरल्याचे बघायला मिळाले. त्यामध्येच अमेरिकेच्या दाव्याने जगात खळबळ उडाली. अली रजा अराफी मारले गेल्याचा दावा एनएसएने केला. इस्रायलच्या न्यूक्लिअर प्लँटवर इराणकडून मोठा धमाका करण्यात आला. या युद्धाच्या झळा अनेक खाडी देशांना बसताना दिसत आहेत. फ्रेंचची युद्ध नौका इराणच्या दिशेने निघाली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी थेट दावा करत म्हटले की, नवे सर्वोच्च नेते खामेनी यांना ठार करण्यात आले. या हल्ल्यात इस्रायलचे १०० सैनिक मारले गेल्याचा दावा इराणकडून करण्यात आला. हेच नाही तर इराणने अमेरिकेचे जेटही पाडले, ज्याचा व्हीडीओ सध्या व्हायरल होत आहे. इस्रायलवर अधिक भीषण हल्ला करणार असल्याचा दावा इराणकडून करण्यात आला आहे. इराणवर अमेरिका मोठे हल्ले करत आहे. या युद्धाचा थेट फटका दुबईला बसल्याचे दिसत आहे.

---------

### युद्धामुळे पर्यटन व्यवसाय संकटात

चढला असून इराणने अमेरिकेच्या तळांवर हल्ला चढवला आहे. एकूण सहा देशांत अमेरिकेचे लष्करी तळ आहेत. या ठिकाणांना इराणने लक्ष्य केले आहे. दुबईतील अमेरिकेच्या तळावर हल्ला चढवताना दुबईतील इतर भागांनाही लक्ष्य करण्यात आले आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. या हल्ल्यानंतर जगभरातील देशांनी आखाती देशातील उड्डाणे थांबविली आहेत. त्यामुळे त्याचा पर्यटन व्यवसायाला मोठा फटका बसला आहे. एकट्या महाराष्ट्रातच ९९ टक्के बुकिंग रद्द झाल्याने पर्यटन व्यवसायाचा पुरता बोऱ्या वाजला आहे. भारतातील भांडवली बाजारावर जसा याचा परिणाम झाला तसा पर्यटन व्यवसायावरही परिणाम दिसत आहे. परदेशात फिरायला जाणाऱ्या ९० टक्के लोकांनी बुकिंग रद्द केले आहे. जगभरात सुरू असलेल्या घटनांमुळे पर्यटन व्यवसायावरही मोठा परिणाम झाला आहे. युद्धामुळे आजही असंख्य फ्लाईट्स रद्द करण्यात आल्या आहेत. रविवारी संध्याकाळपर्यंत देशातील १०० उड्डाणे रद्द करण्यात आली होती. मात्र, फ्लाईट्स रद्द झाल्याने शेकडो प्रवाशांना त्याचा फटका बसला आहे. मुक्कामासाठी गेलेले नाशिकचे सुमारे २०० भाविक अडकले आहेत. जिद्दा विमानतळ बंद असल्याने अनेक जण अडकून पडल्याची माहिती समोर आली आहे. जळगाव जिल्ह्यातील ३१ नागरिक अडकले आहेत. विमा कंपनीच्या कार्यक्रमासाठी जळगाव जिल्ह्यातील ३१ जण गेले होते. पण युद्धामुळे हे सर्वजण दुबईत अडकून पडले आहेत. हल्ल्यामुळे दुबई येथून विमानसेवा बंद झाल्यामुळे सर्व जण अडकले आहेत. मात्र, हे सर्वजण हॉटेलमध्ये सुखरूप असल्याची माहिती समोर आली आहे.

------------

### कृषी विभागातील घोटाळा प्रकरणात धनंजय

अस्तित्वात असताना आणि त्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितलेली नसताना, त्या आदेशाच्या विरुद्ध लोकायुक्त वेगळा निर्णय देऊ शकत नाहीत. त्यामुळे कृषी खरेदी प्रकरणात हस्तक्षेप करता येणार नसल्याचे नमूद करत तक्रार फेटाळण्यात आली. 'ऑफिस ऑफ प्रॉफिट' संदर्भात भारतीय राज्यघटनेतील कलम १०२ व १०३ नुसार अपात्रतेबाबत निर्णय घेण्याचा अधिकार राष्ट्रपतींकडे असल्याचे लोकायुक्तांनी नमूद केले. त्यामुळे या मुद्द्यावर चौकशी अथवा आदेश देण्याचा अधिकार लोकायुक्तांकडे नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले. दरम्यान, लोकायुक्तांच्या निर्णयानंतरही हा विषय सार्वजनिक हिताचा असल्याचे सांगत अंजली दमानिया यांनी भ्रष्टाचाराविरोधातील लढा सुरूच राहील, अशी भूमिका मांडली आहे. उपलब्ध कागदपत्रे व पुराव्यांच्या आधारे पुढील कायदेशीर पर्यायांचा विचार केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

------------

### व्हिएसआरचा मालक

ट्वीट केला होता. त्यामध्ये रोहित सिंग हा वैमानिकाच्या बाजूला झोपलेला दिसत आहे. असाच बेजबाबदारपणा अजितदादांच्या विमाना अपघातावेळी झाला होता का? असा सवाल जय पवारांनी केला आहे. जय पवारांच्या या शंकेचे राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनीही समर्थन केलं आहे. यासंदर्भात सरकारने व्हीएसआर व्हेंचरचा मालक रोहित सिंगला तात्काळ अटक करावी अशी मागणी केली आहे. यासोबतच अधिक चौकशीसाठी डीजीसीएच्या अधिकाऱ्यांनाही सरकारने ताब्यात घ्यावं, अशी मागणी आमदार अमोल मिटकरी यांनी केली आहे. या संपूर्ण लढ्यात राष्ट्रवादीचे सर्व कार्यकर्ते जय पवार यांच्या सोबत असल्याचच आमदार मिटकरी म्हणाले. आम्ही सरकारमध्ये असलो तरी सरकारने रोहित सिंगला अटक न केल्यास राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते लढा उभारतील, असेही आमदार अमोल मिटकरी म्हणाले.

-------------

### समाजकल्याण वसतिगृहांच्या नावांमधील

येणार आहेत. हा निर्णय समाजकल्याण आयुक्तालयाने मागील वर्षी राज्य सरकारला पाठवलेल्या प्रस्तावानुसार घेण्यात आला आहे. या बदलामुळे वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांना सन्मानजनक ओळख मिळेल आणि समाजातील समानतेची भावना अधिक दृढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

-----------

### माजी खा.डॉ.जनार्धन

११ नोव्हेंबर १९३४ रोजी जन्मलेल्या डॉ. वाघमारे यांनी आयुष्यभर शिक्षण आणि सामाजिक परिवर्तनाच्या कार्यासाठी स्वत:ला वाहून घेतले. शिक्षणतज्ज्ञ, साहित्य अभ्यासक आणि राजकारणी म्हणून त्यांनी राज्यात व देशात स्वतंत्र ओळख निर्माण केली. डॉ. वाघमारे हे नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ चे संस्थापक व पहिले कुलगुरू होते. विद्यापीठाच्या स्थापनेपासून शैक्षणिक पायाभूत रचना उभारण्यापर्यंत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. मराठवाड्यात उच्च शिक्षणाची दारे सर्वसामान्यांसाठी खुली करण्यामागे त्यांचा मोठा वाटा होता. इंग्रजी साहित्याचे प्राध्यापक म्हणून त्यांनी दीर्घकाळ अध्यापन केले. निग्रो साहित्य, दलित साहित्य आणि पुरोगामी साहित्य चळवळीवर त्यांनी सखोल अभ्यासपूर्ण लेखन व संशोधन केले. सामाजिक न्याय, समता आणि परिवर्तनवादी विचारसरणी यांवर त्यांनी परखड मांडणी केली.

----------------





**बीडः शहरातील माळीवेस, हनुमान मंदिर येथील मुख्य चौकातील मानाच्या होळीचे पूजन हनुमान मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष श्री. सुनील भाऊ जाधव यांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी प्रमुख उपस्थिती शिवसेनेचे जिल्हाप्रमुख ॲड. चंद्रकांत नवले यांची होती. यावेळी श्री. विश्वासराव मनसबदार काका, डॉ. लक्ष्मीकांतजी बाहेगव्हाणकर, श्री. शांतीलालजी पटेल, शिवसेना ज्येष्ठ नेते श्री. आनंतजी साखरे, बंडूभाऊ घोलप, श्री. काटकर, श्री. शिवराजजी धांडे, मनोज अग्रवाल, श्री. संजय गायकवाड, ॲड. धांडे, श्री. बाळू धोत्रे, हनुमान मंदिर माळवेस चे पुजारी जगदंबिका प्रसाद, माळवेस परिसरातील नागरिक भाविक भावसंख्येने उपस्थित होते.**

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१२११ दिनांक-२०२५

अर्जदार श्रीमान/श्रीमती मुनवर अब्दुल्लाह कुरेशी रा.जिंतुर ता.जिंतुर जि.परभणी यांनी त्यांचा मुलगा च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | अदनान मुनवर कुरेशी | मुलगा | ०१/०१/२००८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१२०८ दिनांक-२८/११/२०२५

अर्जदार श्रीमान/अबुजर मुनवर कुरेशी रा.जिंतुर ता.जिंतुर जि.परभणी यांनी त्यांच्या मुलगी च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | अबुजर मुनवर कुरेशी | मुलगी | १८/०८/२००३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि. ३ मार्च २०२६


## थोडक्यात



बीड : संत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान बार्शी रोड बीड या ठिकाणी मातृभूमी प्रतिष्ठानच्यावतीने सामाजिक कार्याबद्दल आदर्श पुरस्कार स्वीकारताना बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे.

## डॉ.योगेश नवले बीएचएमएस परिक्षा उत्तीर्ण; बदामराव पंडीत यांच्याकडून सत्कार

माद‌ळमोही । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील बंगाली पिंपळा येथिल शेतकरी आप्पासाहेब नवले यांचे पुत्र डॉ योगेश आप्पासाहेब नवले यांनी होमिओपॅथी मेडिकल कॉलेज संगमनेर येथून वैद्यकीय क्षेत्रातील बीएचएमएस ही पदवी घेवुन उत्तीर्ण झाल्याबद्दल भाजप नेते, माजी मंत्री बदामराव पंडीत यांनी सन्मानित केले, यावेळी, बंडू नवले यांच्यासह बंगाली पिंपळा ग्रामस्थ उपस्थित होते. गेवराई तालुक्यातील बंगाली पिंपळा येथिल शेतकरी



आप्पासाहेब नवले यांनी शेतात कष्ट करुन मुलगा डॉ योगेश नवले यास होमिओपॅथी मेडिकल कॉलेज संगमनेर येथे बीएचएमएस ही वैद्यकीय क्षेत्रातील उच्च पदवी घेवुन ते आता बंगाली पिंपळा परिसरातील गोरगरीब रुग्णाची सेवा करणार आहेत, प्रथम प्रयत्नात अभ्यास व जिद्दने हे घवघवीत यश संपादित केले आहे, त्यांच्या या यशाबद्दल भाजप नेते, माजी मंत्री बदामराव पंडीत यांनी त्यांचा सत्कार करत पुढिल भावी आयुष्याला शुभेच्छा दिल्या, यावेळी, बंडू नवले व त्यांचे वडील आप्पासाहेब नवले कैलास माने, सुनिल कांडेकर,म्हांडुळा सरपंच सह बंगाली पिंपळा येथिल ग्रामस्थ उपस्थित होते, या घवघवीत यश बद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

## अंबाजोगाईत शहरातूनच होतेय अवजड वाहतुक; अपघात होण्याची शक्यता

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरात गेल्या आठवडाभरापासून जड वाहने आणि ऊसाचे ट्रॅक्टर, ट्रक रिंग रोडऐवजी थेट शहरातून धावत असल्याने वाहतुकीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. संत भगवानबाबा चौक ते यशवंतराव चव्हाण चौक या रिंग रोडचा वापर न करता ही वाहने बस स्थानक,नगर परिषद, डॉ. बाबासाहेब



आंबेडकर चौक या परिसरातील गजबजलेल्या रस्त्यावरून जात आहेत. मुख्य मार्गावर शाळा-महाविद्यालये असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असून, वाहतूक पोलिसांचे याकडे पूर्णतः दुर्लक्ष दिसत आहे. त्याशिवाय, ऊस वाहतूकदारांकडून रात्रीच्या वेळी वाजवल्या जाणाऱ्या मोठ्या आवाजातील गाण्यांमुळे ध्वनी प्रदूषणाचा त्रासही वाढला आहे. प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देऊन जड वाहतूक शहराबाहेरून वळवावी आणि संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिक करत आहेत.

# विज वितरण कंपनीच्या गलथान कारभाराला न्यायालयाचा दणका

## ऊस जळीत प्रकरणी चार लाख रू.नुकसान भरपाई देण्याचा न्यायालयाचा आदेश

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील शेतकरी चंद्रभागाबाई वसंतराव रणखांब यांच्या गट नंबर २५७ मधील ०१हे.४०आर क्षेत्रावरील ऊस व ठिबक सिंचन त्यांचे शेजारी रमेश बाहेती यांच्या गट नंबर २५८ मध्ये असणाऱ्या डी.पी.तील फ्युज तारेच्या स्पार्किंगमुळे लागलेल्या आगीत जळुन खाक झाल्याची घटना एप्रिल २०१५ साली घडली होती, शेतकरी चंद्रभागाबाई वसंतराव रणखांब यांनी तलाठी गंगामसला, तहसीलदार माजलगाव, कार्यकारी अभियंता वि.वि.कं, उपअभियंता वि.वि.कं व मुख्य अभियंता वि.वि.कं, विद्युत निरीक्षक बीड यांना घटनेचे तक्रारी अर्ज दिले होते, त्यानंतर तलाठी पद्माकर मुळाटे यांनी जाय मोक्यावर येऊन पंचनामा केला होता तसेच विद्युत निरीक्षक श्री काळे यांनी घटनेची जायमोक्यावर येऊन पाहणी करून वस्तूनिष्ठ अहवाल दिला होता, त्यामध्ये शेतकरी चंद्रभागाबाई रणखांब यांच्या उस जळीतास विद्युत वितरण कंपनी कारणीभूत असल्याचे निष्पन्न झाल्याने नुकसान भरपाई देण्याची सूचनाही त्यांनी केली होती, त्यानंतर शेतकरी चंद्रभागाबाई वसंतराव रणखांब यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कार्यालयाचे अनेकवेळा उंबरठे झिजवुन नुकसान भरपाई ची मागणी केली होती परंतु त्यांना उडवा उडवीची उत्तरे मिळाल्याने त्यांनी भाई अॅड.नारायण गोले पाटील यांच्यामार्फत रीतसर कायदेशीर नोटीस



देऊन नुकसानीच्या रकमेची मागणी केली होती परंतु म.रा.वि.वि.कं.ने नुकसान भरपाई न दिल्यामुळे शेतकरी चंद्रभागाबाई वसंतराव रणखांब यांनी मा. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर माजलगाव यांचे न्यायालयात नुकसान भरपाईच्या चार लाख रुपयांच्या रकमेसाठी म.रा. वि.वि.कं. विरोधात दावा दाखल केला, त्यानंतर न्यायालयाने म.रा. वि.वि.कंपनीचे मुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता, उपअभियंता यांना दाव्याचे समन्स काढुन म्हणणे देण्यास सांगितले त्यावर म.रा.वि.वि.कं च्या वतीने म्हणणे देण्यात आले, पुढे प्रकरण पुराव्यासाठी लागले असता शेतकरी चंद्रभागाबाई रणखांब यांच्या वतीने त्यांच्यासह शेजारी संपत सोळंके, तलाठी गंगामसला, विद्युत निरीक्षक व जय महेश कारखान्याचे शेतकी अधिकारी यांना साक्षीदार म्हणून तपासले म.रा.वि.वि.कं च्या वतीनेही पुरावा देण्यात आला त्यानंतर दोन्ही पक्षांच्या वकिलांचा युक्तिवाद करण्यात आला, मा. न्यायालयासमोर आलेला पुराव्यावरून मा. दुसरे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर श्री चामले साहेब यांनी जळीत ऊस प्रकरणी म.रा.वि.वि.कं ला जबाबदार धरून शेतकरी चंद्रभागाबाई वसंतराव रणखांब यांना चार लाख रुपये नुकसान भरपाई सह सहा टक्के व्याजाने रक्कम देण्याचा आदेश २४फेब्रुवारी रोजी दिला आहे, शेतकरी चंद्रभागाबाई वसंतराव रणखांब यांच्या वतीने भाई अॅड.नारायण गोले पाटील यांनी काम पाहिले,या निकालामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून म.रा.वि.वि.कंपणीच्या गलथान कारभारास आळा बसण्याची अशा व्यक्त करण्यात येत आहे.

# प्रियदर्शनी प्राथमिक शाळेत पर्यावरण पूरक प्लास्टिक मुक्तीची होळी उत्साहात साजरी

पाटोदा । प्रतिनिधी

शहरात असणाऱ्या प्रियदर्शनी प्राथमिक शाळेमध्ये मु.अ. मोरे सर यांच्या नियोजनातून व शाळेतील शिक्षक श्री माताडे सर ,श्रीमती वीर मॅडम, श्रीमती शेलार मॅडम, यांच्या सहकार्यातून आज दिनांक २ मार्च २०२६ रोजी पर्यावरणाला पूरक प्लास्टिकचा कचरा होळीच्या पवित्र अग्नीत जाळून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणारी होळी आज साजरा करण्यात आली. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना मु.अ.श्री मोरे सर यांनी व्यक्त केले की आपण सर्वत्र पाहतो प्लास्टिकच्या पिशव्या,कॅरीबॅग, प्लास्टिकच्या बाटल्या यांचा खच साचलेला दिसतो. जो कोणत्याही प्रकारे नष्ट होत नाही आणि त्याचा वापर तर सर्वत्र दिसतो . पावसाळ्यात नाल्यांमध्ये हाच कचरा



साचलेला असतो त्यामुळे नाल्यांचे घाण पाणी घरापर्यंत पोहोचते त्यामुळे रोगराई वाढते.. कधी कधी तर शहरातील भटकी जनावरे या कॅरी बॅग मधील अन्न खाताना प्लास्टिक खातात व त्यांच्या पोटात वेगवेगळ्या व्याधी होतात . म्हणून प्लास्टिकचा वापर करू नये अशा पध्दतीची माहिती दिली . शिक्षकांनी माहिती देताना सुचित केले कि कोणताही चांगला संदेश याचा परिणाम बालमनावर तात्काळ होतो करिता शाळेत सर्व विद्यार्थ्यांना प्लास्टिकचे धोके याबाबतची माहिती देऊन आपण स्वतः प्लास्टिकच्या पिशव्या कॅरीबॅग वापरू नयेत करिता माहिती देण्यात आली आज काळाची गरज आहे पर्यावरण संरक्षणाची ती ओळखून छोट्या मुलांनाही पर्यावरणाचे महत्त्व समजावे यासाठीच होळी हा सण वाईट गोष्टींच्या व प्रवृत्तीच्या दहनाचा . यासाठीच घातक असणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांचा कचरा, पाण्याच्या बाटल्याचा कचरा यांची आहुती होळीच्या पवित्र अग्नीत देण्यात आली व प्लास्टिक मुक्तीचा संदेश मुलांना देण्यात आला . याचबरोबर झाडे लावा झाडे जगवा निसर्गाचा समतोल ठेवण्यासाठी झाडांची आवश्यकता आहे यासाठी शासन वेगवेगळ्या पद्धतीने प्रयत्न करते .शासनाच्या प्रत्येक उपक्रमास सहकार्य करावे असे आवाहनही यावेळेस श्री मोरे सर यांनी केले.. शाळेतील या पर्यावरण संरक्षण होळीस श्रीमती गायके मॅडम, श्री. बळीराम नाईकनवरे , अंगणवाडीच्या कदम मॅडम याचीही प्रमुख उपस्थिती होती.. होळीत प्लास्टिकच्या कचऱ्याचे दहन केल्यानंतरनंतर विद्यार्थ्यांनी रंगोत्सवतही पर्यावरण पूरक असणारे रंग एकमेकांना लावून रंगोत्सवाचा आनंद घेतला.

## पान ६ वरुन...

### सामाजिक जाणिवेतून

व गुणवत्ता वाढीसाठी शासन पातळीवर प्रयत्न सुरू असून त्याचे सकारात्मक परिणाम दिसत आहेत, असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, गावातील शैक्षणिक वातावरण सुदृढ करण्यासाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात वस्त्यांमध्ये विखुरलेले वास्तव्य वाढल्याने विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करण्यासाठी सायकलींची गरज निर्माण झाली असून गंगाधर पडोळे यांनी राबवलेला हा उपक्रम अनुकरणीय आहे.डिजिटल युगाचा संदर्भ देताना त्यांनी पालकांना आवाहन केले की, विद्यार्थ्यांना मोबाईलचा वापर योग्य कारणांसाठीच करू द्यावा. आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती आवश्यक असली तरी त्याचा दुरुपयोग टाळण्यासाठी सजग राहणे गरजेचे आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना माजी सरपंच गंगाधर पडोळे यांनी सांगितले की, दरवर्षी आमदार धस यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्याची परंपरा कायम ठेवली आहे. यावर्षी गरजू विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करताना विशेष समाधान वाटत असून पुढेही शैक्षणिक क्षेत्रात असे उपक्रम राबविण्याचा मानस आहे. यावेळी संदीप खकाळ यांनी शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमास भाजपा तालुकाध्यक्ष रमेश गावडे, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब तळेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक जे. एस. भगत यांनी मानले. केळसांगवी येथे पार पडलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांकडून या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करण्यात येत आहे.

### संत बंकटस्वामी महाराजांच्या

बीडच्या श्री क्षेत्र निनगूर येथून पालखीसह दिंडी सोहळ्याचे प्रस्थान होणार आहे.वारकरी संप्रदायातील महान संत बंकट स्वामी महाराज यांचे शिष्य संत वै.संत सुदामदेव महाराज यांनी सुरू केलेल्या पालखी सह दिंडी सोहळयाचे या वर्षीचे ७७ वे वर्ष आहे. वैकुंठवासी रामहरी महाराज,वै. दिगंबर महाराज, यांनी परंपरा अखंड पणे चालवली.आज तीच परंपरा समर्थपणे महंत लक्ष्मण महाराज मेंगडे चालवत आहेत.. यां दिंडीत मराठावाड्यातून हजारो वारकरी सहभागी होतात.मुक्काम दर कोस दर मजल पाई प्रवास करून पंचमी दिवशी दिंडी पैठण मध्ये पोचते. षष्ठीच्या सोहळ्यामध्ये भजन,कीर्तन,भारुड,संगीत भजन आदी कार्यक्रम संपन्न होतात जेवणाची आणि राहण्याची मोफत व्यवस्था संस्थान च्या वतीने केली जाते. त्यामुळे दिंडी सोहळ्या मध्ये हजारो भावीक भक्तानी सहभागी व्हावे असे आवाहन महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी केले आहे.

### नशामुक्त भारत अंतर्गत

जे जे व्यसन करतात त्यांनी होळीच्या दिवशी आपल्या जीवनातील व्यसनांचा नाश करणे गरजेचे आहे व्यसन सोडून चांगली जीवनाला सुरुवात करावी असे आवाहन यावेळी तत्त्वशील कांबळे यांनी केले.यावेळी दत्ता नलावडे यांनी विद्यार्थ्यांना तंबाखूजन्य पदार्थ व व्यसनी पदार्थापासून दूर राहण्यासंबंधीचे मार्गदर्शन केले होळी दिवशी सर्वांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली.

### वडवणी नगरपंचायत

नेतृत्वाची निवड करण्यात आल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांमध्ये स्थायी समिती सभापतीपदी वंदना जगताप, अर्थ व नियोजन समिती सभापतीपदी बन्सीधर केशवराव मुंडे, सार्वजनिक बांधकाम समिती सभापतीपदी गटनेते अस्लम अन्सार कुरेशी, महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी रंजना डिगे, पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती सभापतीपदी मिरा ढोले, महिला व बालकल्याण समिती उपसभापतीपदी रुपिका नहार यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत असून नगरपंचायत प्रशासनाच्या वतीने अभिनंदन सत्कार करण्यात आला.

### देवगाव येथिल कृषी तंत्र

(सहयोगी अधिष्ठता शिक्षण वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी), डॉ.मधूकर खळगे (प्राचार्य घटक कृषी तंत्र विद्यालय आंबेजोगाई) यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.दरम्यान कृषी तंत्र विद्यालय बीड येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये कबड्डी,व्हॉलीबॉल,खो-खो,१०० मीटर,२०० मीटर,४०० मिटर धावणे,गोळा फेक व लांब उडी अशा खेळांचा समावेश होता.सदरील खेळामध्ये देवगाव येथिल कृषी तंत्र विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.त्यामध्ये बिक्कड सखाराम बालासाहेब या विद्यार्थ्यांने १०० मीटर धावणे या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला,२०० मीटर धावणे स्पर्धेत तांदळे ऋषीकेश मधूकर या विद्यार्थ्यांने प्रथम क्रमांक पटकावला,४०० मीटर धावणे या स्पर्धेत घुले राहुल प्रकाश या विद्यार्थ्यांने प्रथम क्रमांक पटकावला आहे.तसेच लांबउडी स्पर्धेत तांदळे विठ्ठल सदाशिव याने प्रथम क्रमांक मिळवला तर गोळा फेक स्पर्धेत चौरे हनुमंत दत्तु या विद्यार्थ्यांने दूतिय क्रमांक पटकावला आसून सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य विजयकांत मुंडे,अतुल मुंडे, शाळेचे प्राचार्य शेख फैयाज लतिफ,प्रा.श्रीकांत माने,प्रा.विलास ठोंबरे,प्रा.अर्जून कानडे,ठोंबरे एस.बी,घोडके एस.एम, सोनवणे एस.बी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### पाटोदा येथील अंगणवाडी

दळवी आणि संदीपान आणपट साहेब यांची विशेष उपस्थिती लाभली होती. तसेच पवन मोरे सर, महेश बेंद्रे सर आणि मा. श्री. सतीश गर्जे सर यांनी मार्गदर्शन करत उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सारिका कदम मॅडम. व अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. टीव्ही संच उपलब्ध झाल्यामुळे आता पाटोदा येथील बालकांना दृकश्राव्य माध्यमातून (-ींवळे-तळींरिश्र) अधिक प्रभावीपणे धडे गिरवता येणार आहेत. या कार्यक्रमाला स्थानिक नागरिक आणि पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती

# यूनिक क्युरियस किड्स स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शन उत्साहात




परळी वैजनाथ । प्रतिनिधी

यूनिक क्युरियस किड्स स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त भव्य विज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या विज्ञान प्रदर्शनात शाळेतील तब्बल ९७ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध विषयांवर आकर्षक आणि नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केले. अनेक विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत विविध बक्षिसेही पटकावली.

विशेष म्हणजे, लहानग्या चिमुकल्यांनी आपल्या प्रकल्पांचे स्पष्ट, आत्मविश्वासपूर्ण आणि प्रभावी स्पष्टीकरण देत उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या जिज्ञासू वृत्तीने आणि सादरीकरण कौशल्याने उपस्थित पालक आश्चर्यचकित झाले व अभिमानाने भारावून गेले.

या कार्यक्रमासाठी परीक्षक व प्रमुख पाहुण्या म्हणून नगरसेविका डॉ. पूजा तोतला मॅडम, सौ. रुची ठक्कर मॅडम आणि सौ. आकांक्षा सेठिया मॅडम व सौ. शीतल पंपालिया मैडम उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.शाळेच्या संचालिका सौ. पूजा सारडा मॅडम तसेच सर्व शिक्षकवृंदांनी या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होत असल्याचे यावेळी अधोरेखित झाले.हा विज्ञान मेळावा केवळ प्रदर्शन न राहता, विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणारा आणि त्यांच्या जिज्ञासेला नवी दिशा देणारा प्रेरणादायी उपक्रम ठरला.

# महेश सिनियर सिटीझन ग्रुपच्या वतीने मोंढ्यात पाणपोई

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी शहरातील मोंढा भागात संकटमोचन हनुमान मंदिराजवळ महेश सिनियर सिटीझन ग्रुप परळी वैजनाथ परिवाराच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही




पाणपोई उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सेवाभावी उपक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शहरातील अनेक मान्यवर, ज्येष्ठ नागरिक व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

उन्हाळ्याच्या तीव्र उष्णतेमुळे नागरिक, प्रवासी व कामगार यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो. अशा परिस्थितीत तहानलेल्या प्रत्येक व्यक्तीस थंड व स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे ही अत्यंत समाजोपयोगी व सेवाभावी कृती मानली जाते. महेश सिनियर सिटीझन ग्रुपने हाती घेतलेल्या या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. उद्घाटन प्रसंगी बोलताना नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी ज्येष्ठ नागरिकांनी पुढाकार घेत राबविलेल्या या सामाजिक बांधिलकीच्या कार्याचे कौतुक केले. समाजासाठी काहीतरी देण्याची भावना जपणारा हा उपक्रम इतरांसाठीही प्रेरणादायी ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. समाजसेवेची ही परंपरा पुढेही अशीच अखंड सुरू राहो, अशी सदिच्छा व्यक्त केली. यावेळी माजी नगराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया, माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव भैय्या धर्माधिकारी, नगरसेविका सौ. शिल्पा जयपाल लाहोटी, माजी नगरसेवक पांडुरंग सोनी, बाजार समिती संचालक जयपाल लाहोटी, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष ज्ञानोबा माऊली फड ,महेश सिनियर सिटीझन ग्रुप चे पदाधिकारी,जेष्ठ नागरिक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१५८५ दिनांक-२४/१२/२०२५

अर्जदार श्रीमान/श्रीमती राणीबाई अनिल पावले रा.दशरथवाडी ता.कोपरगाव जि.अहिल्यानगर यांनी त्यांचा मुलगा नामे चैतन्य अनिल पावले च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|
| चैतन्य अनिल पावले | मुलगा | ०२/०६/२००८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित/-
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१२०८ दिनांक-२८/११/२०२५

अर्जदार श्रीमान/मुनवर अब्दुल्लाह कुरेशी रा.जिंतुर ता.जिंतुर जि.परभणी यांनी त्यांच्या मुलगी च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|
| सानिया मुनवर कुरेशी | मुलगी | १०/११/१९९८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित/-
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१२०९ दिनांक-२८/११/२०२५

अर्जदार श्रीमान/अब्बास गफुर कुरेशी रा.अंबड ता.अंबड जि.जालना यांनी त्यांच्या स्वत: च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|
| शबानाबी अब्बास कुरेशी | मुलगी | ०१/०१/१९८१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.


स्वाक्षरित/-
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

# कांदा-केळी-द्राक्षांचे 1 हजार कंटेनर अडकले

## काही कंटेनर पुन्हा मुंबई बंदराकडे वळवले!

मुंबई : आखाती युद्धाची धग नवी मुंबईतील जेएनपीए बंदरापर्यंत पोहोचली आहे. आखाती देशांकडे निर्यातीसाठी तयार ठेवलेले कांदा, केळी, द्राक्षे यांसह फळफळावळांचे सुमारे १,००० कंटेनर शनिवारपासून अडकून पडले असून, कृषी मालाच्या आयात-निर्यातीवर तब्बल ६० टक्के परिणाम झाल्याची भीती व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

युद्धजन्य परिस्थितीमुळे सागरी वाहतूक क्षेत्रात मोठी अनिश्चितता निर्माण झाली असून, शिपिंग कंपन्यांनीही आखातात माल पाठविण्यास नकार देण्यास सुरुवात केली आहे. जहाजांवर हल्ल्याचा धोका वाढल्याने अनेक कंपन्यांनी मालवाहतूक तात्पुरती थांबवली. जेएनपीए बंदरातून इराक, सौदी अरेबिया, कतार यांसारख्या देशांमध्ये फळे-भाजीपाला निर्यात होतो. मात्र, युद्धाच्या भीतीमुळे जहाजे पाठविणे थांबले असून, काही जहाजांना तर माघारी परतण्याचे आदेश देण्यात आले आहेत. परिणामी, निर्यातीसाठी तयार माल बंदरातच अडकून पडला आहे. शिपिंग कंपन्या निर्यातीसाठी पुढे येत



नसल्याने कृषी व्यापाराला फटका बसला आहे. आयात-निर्यातीवर ६० टक्के परिणाम झाला आहे, अशी माहिती निर्यातदार राहुल पवार यांनी दिली. आखातातील युद्धजन्य परिस्थितीमुळे सोलापूर जिल्ह्यातून इराण, इराक, सौदी, बहरीन, कुवेत येथे नवी मुंबईतील जेएनपीटी बंदरावरून पाठविण्यात आलेल्या केळीचे २५० कंटेनर दुबई व इराणच्या मध्यभागी असलेल्या होरमुज बंदरावर शनिवारी रोखण्यात आले. कंटेनरचे जहाज पुन्हा नवी मुंबईच्या जेएनपीटी बंदराकडे वळविण्यात आलेले आहेत. जेएनपीएतून दर आठवड्याला सुमारे ५४ मालवाहू जहाजांची ये-जा होते. युद्धाचा संपूर्ण परिणाम स्पष्ट होण्यासाठी अजून काही दिवस लागतील, अशी प्रतिक्रिया बंदर प्रशासनातील अधिकाऱ्यांनी दिली. मध्यपूर्वेत तणाव वाढल्याने भारत सरकारच्या दूतावासाने त्या भागात राहणाऱ्या भारतीय नागरिकांसाठी सुरक्षाविषयक सूचना जारी केल्या असून, महाराष्ट्र सरकारने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत त्यांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

## कापसाचे उत्पादन केवळ काढणीपुरते मर्यादित राहू नये!

### विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे यांचे प्रतिपादन



संभाजीनगर : केवळ कापसाचे उत्पादन घेण्यापुरते मर्यादित न राहता शेतकऱ्यांनी उत्पादित कापसाचे जिनिंग प्रेसिंग धागा कपडा डाईंग आदी प्रक्रियेनंतर कापसाच्या मूल्य साखळी विकासाचे गणित समजून घेणे आवश्यक, असल्याचे मत विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे यांनी व्यक्त केले.

केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूर, अटारी, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठासह, कृषी विज्ञान केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष कापूस प्रकल्पांतर्गत कापूस उत्पादकांचा मेळावा कृषी विज्ञान केंद्राच्या प्रांगणात घेण्यात आला. त्यावेळी वानखेडे बोलत होते. ते म्हणाले की, वातावरणाचा बदल कीड रोगांचा प्रादुर्भाव बीटी तंत्रज्ञानाच्या उणिवा आपण समजून घेतो आहोत. जमिनीचा कर्ब कमी होत चालला असून सर्वच संकटांमुळे उत्पादन खर्च वाढून बसला आहे. जमिनीच्या सुपीकतेसाठी सेंद्रिय कर्ब वाढीकडे आपल्याला लक्ष द्यावे लागेल. दहा ड्रम थेरीसारखे प्रयोग उत्पादन खर्च कमी करण्यास मदत करतील. 'एक गाव-एक वाण' ही संकल्पनाही आपल्याला प्राधान्याने राबवावी लागेल. राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्पाचे विस्तार कृषी विद्यावेत्ता डॉ. सूर्यकांत पवार म्हणाले, की तंत्रज्ञानाचा स्वीकार उत्पादकता वाढीसाठी फायद्याचा ठरतो. कपाशीची लागवड जमिनीच्या प्रकारानुसार करावी. झाडांची संख्या भारी जमिनीत कमी व हलक्या जमिनीत जास्त राहील अशी शिफारसीत लागवड फायद्याची ठरते. दादा लाड तंत्रज्ञानाबरोबरच कपाशीचे वाण निवडताना ते किती कालावधीचे हे लक्षात घ्यावे लागेल. माती परीक्षण आधारावर खत व्यवस्थापन असावे. यावेळी शेतकरी पंढरीनाथ काचोळे व कार्तिक मिरगे, प्रभावती पडूळ यांनी आपले अनुभव कथन केले. कापूस उत्पादक शेतकरी अण्णा मिरगे, विष्णू पंडित, नारायण गावडे, विजय शेळके, धोंडीबा घायट, कार्तिक मिरगे, गणेश घायट, रत्ना भाटेकर आदींचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन प्रतिनिधिक सत्कार करण्यात आला. विशेष कापूस प्रकल्पात योगदान देणाऱ्या कृषी विज्ञान केंद्राच्या कार्यक्रम समन्वयिका डॉ. दीप्ती पाडगावकर, डॉ. बसवराज पिसुरे, सतीश कदम, जगदेव सिंगल आदींचाही सत्कार करण्यात आला. यावेळी कृषी उपसंचालक दीपक गवळी यांनी सूक्ष्म अन्य प्रक्रिया उद्योगातील संधी व महाविस्तार ॲप विषयी माहिती दिली. यावेळी कृषी विज्ञान केंद्र बदनापूरचे डॉक्टर सचिन सोमवंशी, सोयगावचे तालुका कृषी अधिकारी भरत कासार, नेटाफिमचे सागर खोडके, आदींची उपस्थिती होती. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. अनिता जिंतूरकर यांनी केले.

## काळ्या पेरूच्या शेतीतून मिळते बंपर उत्पादन

शेतकरी मित्रांनो हिरवा पेरू लाल पेरू अशा पेरूच्या जाती आपल्याला माहीतच असतील मात्र तुम्ही कधी काळ्या पेरूच्या शेतीबद्दल ऐकले आहे का ? भारतातील शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी नवीन बदल केले जात आहेत. दरम्यान, शेतकऱ्यांना महागडी, दुर्मिळ आणि नगदी पिके घेण्यासही प्रोत्साहन दिले जात आहे, कारण या पिकांना बाजारात मागणी आणि किंमतही जास्त आहे. अशाच एक दुर्मिळ आणि महागड्या पिकामध्ये काळ्या पेरू शेतीचा समावेश होतो, ज्यामध्ये सध्या असलेले औषधी गुणधर्म आरोग्यासाठी फायदेशीर तर आहेतच, शिवाय शेतकऱ्यांना कमी वेळात चांगला नफाही देऊ शकतात. त्याच्या वैशिष्ट्यांमुळे, ही जात खूप लोकप्रिय झाली आहे. कमी खर्चात लागवड करून शेतकरी चांगले उत्पन्न मिळवू शकतात.

काळा पेरू : सामान्य पेरूच्या तुलनेत, काळ्या पेरूमध्ये औषधी गुणधर्म, आवश्यक पोषक आणि ॲंटिऑक्सिडंट्स असतात, जे शरीराची प्रतिकारशक्ती वाढवून रोगांपासून संरक्षणाचे काम करतात. त्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते वृद्धत्वाची लक्षणे रोखण्यासाठी उपयुक्त आहे. या कारणासाठी काळ्या पेरूमध्ये वृद्धत्वविरोधी गुणधर्म देखील असतात.

काळ्या पेरूची लागवड : काळ्या पेरूची ही जात बिहार कृषी विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी विकसित केली, त्यानंतर देशभरातील बहुतांश शेतकऱ्यांनी फळबाग लागवड करण्यास सुरुवात केली. अलीकडे हिमाचल प्रदेशातील सिरमौर जिल्ह्यातील कोलार भागात काळ्या पेरूची लागवड सुरू झाली आहे. येथे उत्तर प्रदेशच्या सहारनपूर (उत्तर प्रदेश) रोपवाटिकेतून रोपे खरेदी करून पुनर्रोपणाचे काम करण्यात आले आहे. काळ्या पेरूच्या पानांचा आणि आतल्या लगद्याचा रंग देखील गडद लाल किंवा शोक असतो. काळ्या पेरूच्या फळाचे वजन सुमारे १०० ग्रॅम असते. ते दिसण्यात जितके आकर्षक आहेत, तितकाच कमी खर्च त्यांच्या लागवडीत होतो. सर्वात चांगली गोष्ट म्हणजे याची लागवड फक्त थंड प्रदेशात केली जाते आणि त्याच्या फळांमध्ये कीटक-रोग येण्याची शक्यता नसते.

व्यावसायिक शेतीचा फायदा होईल : आतापर्यंत देशभरात केवळ पिवळा पेरू आणि हिरवा पेरू यांचाच दबदबा आहे, परंतु काळ्या पेरूची व्यावसायिक शेती नवीन बाजारपेठ निर्माण करू शकते. त्याच्या लागवडीसाठी थंड आणि कोरडे तापमान असावे लागते. तर पाण्याचा निचरा होणारी चिकणमाती माती उत्तम आहे. कृषी तज्ज्ञांच्या मते, काळ्या पेरूची लागवड करण्यापूर्वी जमिनीची तपासणी करून तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा, जेणेकरून पिकाला धोका होण्याची शक्यताही कमी असते.



## दिन विशेष

### जागतिक दिवस

हिनामात्सुरी जपान, शहीद दिन मलावी
मुक्ति दिन बल्गेरिया

### महत्वाच्या घटना

००७८ : शालीवाहन शक सुरु
१८४५ : फ्लोरिडा हे अमेरिकेचे २७ वे राज्य बनले.
१८६५ : हाँगकाँग अँड शांघाय बँकिंग कार्पोरेशनीची स्थापना झाली.
१८८५ : अमेरिकन टेलिफोन अँड टेलिग्राफ कंपनीची स्थापना झाली.
१८८५ : अमेरिकन टेलिफोन व तार कंपनी न्यू यॉर्क मध्ये समाविष्ट झाले।
१९२३ : वेळ नियतकालिक प्रथमच प्रकाशित झाले होते.
१९३० : नाशिक येथील काळा राम मंदिरात सर्वांना प्रवेश मिळावा यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सत्याग्रह केला.
१९३८ : सौदी अरेबिया मध्ये खनिज तेलाचा शोध लागला.
१९३९ : मुंबई येथे मोहनदास गांधी यांनी भारतात हुकूमशाही नियम निषेध उपास सुरु केला होता.
१९४३ : दुसरे महायुद्ध लंडनमधे बॉम्बविरोधी आश्रयस्थानात घुसताना झालेल्या चेंगराचेंगरीत १४३ ठार
१९६६ : डॉ. धनंजयराव गाडगीळ पुणे विद्यापीठाचे सहावे कुलगुरू झाले.
१९७३ : ओरिसात राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली.
१९८६ : ऑस्ट्रेलिया कायदा १९८६ प्रमाणे, ऑस्ट्रेलिया देश युनायटेड किंगडम पासुन पूर्णपणे स्वतंत्र झाला.
१९९१ : रेल्वे कर्मचाऱ्यांचे पहिले मराठी साहित्य संमेलन झाले
१९९४ : जयपूर येथील गिटारवादक पंडित विश्वमोहन भट यांना 'ग्रॅमी पुरस्कार' प्रदान
२००३ : महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे देण्यात येणार्या 'शरच्चंद्र चटोपाध्याय' पुरस्कारासाठी ज्येष्ठ लेखिका डॉ. सरोजिनी वैद्य यांची निवड
२००५ : स्टीव्ह फॉसेट यांनी 'ग्लोबल फायर' या मुलुखावेगळ्या विमानातून एकट्याने आणि पुन्हा इंधन न भरता ६७ तासात पृथ्वीप्रदक्षिणा पूर्ण केली.
२०१५ : २० डिसेंबर २०१३ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाने ३ मार्च हा जागतिक वन्यजीव दिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३९ : टेलिफोनचा जनक ग्रॅहम बेल यांचा जन्म
१८३९ : जमशेदजी नसरवानजी टाटा आधुनिक औद्योगिक भारताचे शिल्पकार व टाटा उद्योग समुहाचे संस्थापक (मृत्यू: १९ मे १९०४)
१८४५ : जी. कँटर जर्मन गणितज्ञ (मृत्यू: ६ जानेवारी १९१८)
१८४७ : अलेक्झांडर ग्रॅहम बेल स्कॉटिश अमेरिकन पदार्थ वैज्ञानिक, टेलिफोनचा संशोधक (मृत्यू: २ ऑगस्ट १९२२)
१८६० : प्लेग प्रतिबंधक लस शोधणाऱ्या डॉ. हापकीन यांचा जन्म
१९२० : किर्लोस्कर मासिकाचे संपादक मुकुंद शंकरराव किर्लोस्कर यांचा जन्म.
१९२३ : इतिहासकार आणि ललित लेखक प्रा. सदाशिव नथोबा आठवले यांचा जन्म.
१९२६ : रवि शंकर शर्मा ऊर्फ 'रवि' संगीतकार (मृत्यू: ७ मार्च २०१२)
१९२८ : अख्तर हुसेन यांचा जन्म
१९२८ : कवी आणि लेखक पुरुषोत्तम पाटील यांचा जन्म.
१९३९ : एम. एल. जयसिंहा कसोटी क्रिकेटपटू, शैलीदार फलंदाज (मृत्यू: ६ जुलै १९९९)
१९५५ : जसपाल भट्टी विनोदी अभिनेते (मृत्यू: २५ आक्टोबर २०१२)
१९६७ : शंकर महादेवन गायक व संगीतकार
१९७० : इंझमाम उल हक पाकिस्तानी क्रिकेटपटू
१९७७ : अभिजीत कुंटे भारताचा चौथा आणि महाराष्ट्राचा दुसरा ग्रँडमास्टर
१७०३ : रॉबर्ट हूक इंग्लिश वैज्ञानिक (जन्म: १८ जुलै १६३५)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७०३ : रॉबर्ट हूक इंग्लिश वैज्ञानिक (जन्म: १८ जुलै १६३५)
१७०७ : औरंगजेब सहावा मोगल सम्राट (जन्म: ४ नोव्हेंबर १६१८)
१९१९ : नारायण हरी आपटे कादंबरीकार (जन्म: ८ मार्च १८६४)
१९६५ : अमीरबाई कर्नाटकी पार्श्वगायिका व अभिनेत्री (जन्म: १९०६)
१९२४ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकीचे वे२८ राष्ट्राध्यक्ष वूड्रो विल्सन यांचे निधन.
१९८२ : रघुपती सहाय ऊर्फ फिराक गोरखपुरी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ऊर्दू शायर (जन्म: २८ ऑगस्ट)
१९९५ : पं. निखिल घोष तबलावादक
२००० : रंजना देशमुख, मराठी चित्रपट अभिनेत्री.

## केळीवरील करपा रोगाचे व्यवस्थापन

राज्यात केळीची लागवड दरवर्षीप्रमाणे मोठ्या प्रमाणात झाली आहे. मात्र, केळीच्या झाडांवर करपा रोगाचा प्रादुर्भाव वाढत आहे. शेतकरी प्रतिबंधात्मक आणि निवारात्मक उपाय केल्यास केळीवरील करपा रोगाची प्रादुर्भाव कमी होऊ शकतो. केळीवरील करपा रोग : केळीवरील करपा रोगाला इंग्रजीत याला सिगाटोका म्हणतात. हा रोग मायकोस्पेरिला म्युसिकोला या बुरशीमुळे होतो. या रोगाच्या प्रादुर्भावामुळे पिकाचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असते.

लक्षणे : या रोगाचा प्रादुर्भाव सुरुवातीला पिकाच्या जुन्या पानांवर दिसतो. पानांच्या शेंडा आणि कडांपासून याला सुरुवात होते. करपा रोगामुळे पानांवर पिवळे किंवा तपकिरी रंगाचे ठिपके दिसू लागतात. ते ठिपके वाढत जाऊन पाने पिवळी पडून वाळायला लागतात. रोगाचा प्रादुर्भाव वाढल्यास पाने फाटतात, पाने झाडांवरच देठापासून मोडून लोंबकळतात आणि झाडाची वाढ खुंटते. परिणामी अन्ननिर्मितीमध्ये अडथळा होतो, केळीमध्ये गर भरत नाही आणि अपरिपक्व फळे अकाली पिकतात आणि घडातून गळू लागतात आणि उत्पादन कमी होते.

रोगासाठी अनुकुल वातावरण : सतत पाऊस, दवबिंदू, उष्ण व दमट हवामान या रोगाच्या वाढीस अनुकूल आहे. पावसाळ्यात रोगकारक बुरशीची वाढ होते आणि हिवाळ्यात तापमान कमी झाल्यावर रोगाचा प्रादुर्भाव दिसून येतो.

एकात्मिक व्यवस्थापन : करपा रोगाच्या व्यवस्थापनासाठी प्रतिबंधात्मक (रोग होऊ नये यासाठी) आणि निवारात्मक (रोग झाल्यानंतरचे नियंत्रण) उपाय करणे आवश्यक असतात.

प्रतिबंधात्मक उपाय : लागवडीसाठी कंद निवडताना निरोगी बागेतूनच निवडावी. शक्यतो कंदप्रक्रिया केल्याशिवाय लागवड करु नये. लागवड करताना झाडांची दाटी होणार नाही या अंतराने लागवड करावी. केळीची बाग आणि बांध कायम तणमुक्त आणि स्वच्छ ठेवावीत. केळी हे पीक सतत न घेता पिकाची फेरपालट करावी. लागवड करताना पूर्वीच्या पिकाचे अवशेष बागेतून गोळा करुन नष्ट करावेत.

प्रतिबंधात्मक रासायनिक उपाय : मॅन्कोझेब किंवा कॉपर ऑक्सीक्लोराईट किंवा क्लोरोथ्यलोनिल २० ते २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून दोन वेळा फवारणी करावी.

निवारात्मक उपाय : रोगट पानांचा भाग किंवा कापून नष्ट करावीत. पानाचा ३० टक्के भाग करपल्यास ते पान काढून जाळून नष्ट करावे. बागेत पाणी साचून राहणार नाही आणि योग्य निचरा होईल याची काळजी घ्यावी. जास्त आर्द्रता तयार होणार नाही याची काळजी घ्यावी. योग्य प्रमाणात झाडांना अन्नद्रवे द्यावीत.

रासायनिक नियंत्रण : केळी रोगावरील करपा रोगासाठी केळी संशोधन केंद्र आणि महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीमध्ये रासायनिक उपायांची शिफारश केली आहे. रोगाचा प्रादुर्भाव दिसल्यास कार्बेनडॅन्झिम १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात टाकून फवारणी करावी. रोगाचा प्रादुर्भाव जास्त दिसून आल्यास प्रोपीकोनिझोल ५ मिली व मिनरल ऑईल १०० मि.लि. किंवा मेटीरम ५५ टक्के + पायऱ्याक्लोस्ट्रोबिन ५ टक्के (६० टक्के डब्ल्यू जी) ३० ग्रॅम १०लिटर पाण्यात मिसळून फवारावे. त्यानंतर १५ ते २० दिवसांच्या अंतराने २ फवारण्या कराव्या. शेतकरी सहसा रोगाची लक्षणे दिसायला लागल्यानंतर रासायनिक औषधांची फवारणी करतात. परंतु तोपर्यंत रोगाचा प्रसार झालेला असतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी लक्षणे दिसण्यापूर्वीच फवारणी करावी. शक्यतो कंदप्रक्रिया करुन लागवड केल्यास प्रतिबंध करण्यास मदत होते. या रोगाच्या प्रतिबंधासाठी



पिकाची फेरपालट करणे अत्यंत आवश्यक असते, असा सल्ला केळी संशोधन केंद्राचे कनिष्ठ वनस्पती रोगशास्त्रज्ञ डॉ. व्ही. टी. गुजर यांनी दिला.

मंगळवार दि.३ मार्च २०२६ ५

राज्य लोकतंत्र मराठवाडा वृत्तांत

# महिलांनी शासकीय योजना व अनुदानाचा लाभ घ्यावा -प्रिया जोशी

## प्रस्ताव दाखल केल्यास अधिवेशनात कर्ज वाटपचे प्रयत्न–सिता मोहिते

जालना । प्रतिनिधी

व्यापारी महासंघ व जनरल मर्चन्टस्? असोसिएशन जिल्हा जालनाच्या महिला – पुरुष पदाधिकाऱ्यांची महत्वपुर्ण बैठक मराठवाडा विभागीय अध्यक्ष हस्तीमलजी बंब यांच्या अध्यक्षतेखाली दि. १ मार्च २०२६ रविवार रोजी हॉटेल सात्विक भोज येथे अति उत्साहात पार पडली. त्या प्रसंगी प्रास्ताविक करताना बंब म्हणाले होतकरु, कष्टकरी, विशेष करुन ग्रामीण भागातील लहान–सहान उद्योग व्यवसायातील गरजु महिलांसाठी अनेक शासकीय योजना आहेत. त्यावर मोठ्या प्रमाणावर अनुदान सुध्दा आहे. नाम मात्र व्याजाने कर्ज उपलब्ध आहे. म्हणून महिलांचा प्रथम जिला अधिवेशन येत्या १७ मार्च २०२६ मंगळवार रोजी जैन भवन, सकलेचा नगर, जालना येथे सकाळी ८.०० वाजे पासुन दुपारी ३.०० वाजे पर्यंत आयोजित करण्यात आले आहे, असे बंब म्हणाले.



या भव्य अधिवेशनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या शुभ हस्ते करण्यात येईल. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष पद उद्योजिका व रोटरी क्लब चा अध्यक्षा सौ. वर्षा पित्ती हे भूषवतील. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषद सी.ई.ओ. श्रीमती पी. एम. मिन्नु, अग्रीन महाराष्ट्र बँकचे जिला मॅनेजर श्री मंगेश केदार, जिल्हा उद्योग केंद्र चे महाव्यवस्थापक योगेश सारणीकर, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी भिमराव वाघमारे, कॅट व्यापारी संघटनाची राष्ट्रीय संयोजिका श्रीमती पोर्णिमा शिरीषकर, राज्य अध्यक्ष सचिन निवंगुणे, राज्य उपाध्यक्ष सतिष पंच, मराठवाडा विभागीय महिला अध्यक्षा सौ. सिता मोहिते पाटील, सचिव सौ. आनंदी अय्यर इ. राहतील. पुढे बोलतांना बंब म्हणाले नुकतेच जालना जिल्ह्याचे संपर्क दौरा करून महिला अधिवेशनाच्या प्रचार व निमंत्रण प्रत्येक गावात प्रत्यक्षात देण्यात आले. जिल्ह्यातील सर्व तालुका अंतर्गत महिला आघाडीची ३५ गावात अध्यक्षा, पदाधिकारी यांची निवड करुन शाखा उघडण्यात आली आहे. हे संपुर्ण मराठवाड्यातील महिला पुरुष विभागाच्या नेतृत्व करण्याची संधी जालना जिल्ह्याला मिळालेली आहे. महिलांचे इतके मोठे नेटवर्क असलेला संपुर्ण राज्यात आपला एकमेव जालना जिल्हा आहे. शासकीय उद्योग केंद्र व बँकाना अनुदान व कर्जासाठी लागणारे सर्व कागदपत्र यांची माहिती प्रत्येक गावात महिलाची मिटींग घेऊन देण्यात आलेली आहे. अनेक गांवाच्या महिलांचे प्रस्ताव सुध्दा दाखल करण्यात येत आहे. अधिवेशनाच्या माध्यमाने गरजु महिलांना कर्ज उपलब्ध करून देणारा राज्यात ही नाही देशात एकमेव आपला जिला आहे, असे बंब म्हणाले. आयोजक जिल्हाध्यक्ष प्रिया जोशी मनोगत व्यक्त करताना मागील दोन महिण्यापासुन दौरे संपर्क करुन गावा–गावात गरजु महिलांसाठी विशेष करून ग्रामीण भागासाठी उद्योग व्यवसायात शासकीय योजना कर्ज अनुदान संदर्भात संपुर्ण जिल्ह्यात जन–जागरण करण्यात आले आहे. जिला उद्योग केंद्र, बँकचे अधिकारी यांच्या सोबत बैठक चर्चा करून माहिती घेण्यात आली. प्रथमच महिलांच्या होत असलेले भव्य जिल्हा अधिवेशनात गरजु महिलांनी उपस्थित राहुन शासकीय योजनाचा, अनुदानाचा लाभ घ्यावा, असे सौ. जोशी म्हणाल्या. सौ. सिता मोहिते मार्गदर्शन करताना शहरातील विशेष करून ग्रामीण भागातील उद्योग व्यवसायात कार्यरत आपला उद्योग वाढीसाठी १० मार्च पर्यंत सर्व कागदपत्र योग्य प्रस्ताव दाखल केल्यास शासनाकडुन मंजुर करुन अधिवेशनात कर्ज वाटप चे प्रयत्न आमचे आहे, असे मोहिते म्हणाल्या. सौ. आनंदी अय्यर, श्री सतिष पंच, सुखदेव बजाज, अंकुश राऊत, संदीप काबरा यांनी ही आपले विचार मांडले. बैठकीचे यशस्वीतेसाठी जिल्हा सचिव प्रविण मोहता, राम मोहिते, प्रमोद जोशी, जगदीश अग्रवाल, सौ. संगिता शेळके आदिनी परिश्रम घेतले. बैठकीचे सुत्र संचालन गोविंद साखला यांनी केले तर आभार महिला जिला सचिव सौ. संगिता पांगारकर यांनी मांडले.

# राज्यात एसटीच्या स्मार्ट कार्ड नोंदणीला प्रतिसाद-मंत्री प्रताप सरनाईक

## आठ दिवसात १ लाखाचा टप्पा पार

जालना। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) डिजिटल सेवांच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल म्हणजे ' स्मार्ट कार्ड' उपक्रम होय. सवलत धारक प्रवाशांच्या सोयीसाठी सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, नोंदणीची संख्या आता १ लाखाच्या महत्त्वपूर्ण टप्प्यापर्यंत पोहोचली आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. ही संख्या केवळ एक आकडा नसून, एसटीच्या डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने झेपावणाऱ्या प्रवासाची ठोस साक्ष आहे.असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी केले आहे. केवळ आठवड्याभरात या उपक्रमांतर्गत एकूण १,००,०२१ प्रवाशांनी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली आहे. यात 'महिला सन्मान योजना' लाभार्थ्यांचा सर्वाधिक सहभाग असून तब्बल ३७,९२७ महिलांनी या आधुनिक सुविधेचा स्वीकार केला आहे. त्याचप्रमाणे 'अमृत ज्येष्ठ नागरिक' योजनेअंतर्गत ३४,९४८ ज्येष्ठ नागरिकांनी नोंदणी करून डिजिटल प्रवासाच्या नव्या पर्वाचे स्वागत केले आहे. तसेच इतर ज्येष्ठ नागरिक २४,९२७ आणि इतर



प्रवासी २,२१९ अशा विविध घटकांनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला आहे.

एसटी महामंडळाचा हा उपक्रम केवळ तांत्रिक बदल नसून, प्रवाशांच्या प्रवासाला अधिक सुलभ, सुरक्षित आणि पारदर्शक बनविण्याचा दूरदर्शी प्रयत्न आहे. रोख व्यवहारांच्या पारंपरिक चौकटीतून बाहेर पडत, डिजिटल माध्यमांचा स्वीकार करण्यासाठी प्रवासी वर्ग मोठ्या प्रमाणात पुढे येत असल्याचे या नोंदणीच्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. १ मार्चपासून स्मार्ट कार्ड असल्याशिवाय सवलत धारक प्रवाशांना प्रवास करता येणार नाही, अशी अफवा समाज माध्यमांवर पसरली होती. तथापि, जोपर्यंत ८०% सवलत धारक प्रवाशांची स्मार्ट कार्डची नोंदणी पूर्ण होत नाही, तोपर्यंत स्मार्ट कार्ड अनिवार्य केले जाणार नाही, असे एसटी महामंडळाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे प्रवाशांनी आपल्या जवळच्या बसस्थानक, आगार अथवा अधिकृत खासगी एजंट कडे स्मार्ट कार्ड नोंदणी करावी , असे आवाहन महामंडळातर्फे केले आहे.

भविष्यात स्मार्ट कार्डमुळे सवलत धारक प्रवाशांना तिकीट खरेदी अधिक सुलभ होणार असून, भविष्यात एकच कार्ड विविध सार्वजनिक वाहतूक सेवांसाठी उपयोगात येण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. एसटी महामंडळाने हाती घेतलेला हा अभिनव उपक्रम डिजिटल महाराष्ट्राच्या स्वप्नाला साकार करण्याच्या दिशेने एक भक्कम पाऊल ठरत असून, प्रवाशांच्या विश्वासाच्या बळावर हा प्रवास अधिक वेगाने पुढे जात आहे. असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे. अशी माहिती अभिजीत भोसले, जनसंपर्क अधिकारी यांनी दिली आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अंतर्गत नागरिकांना सेवा उपलब्ध करून द्याव्यात–जिल्हाधिकारी

जालना। प्रतिनिधी

प्रत्येक मंडळातील नागरिकांना महसूल विभागाच्या सर्व सेवा शिबिराच्या माध्यमातून सुलभ व तात्काळ उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले. त्या आज दि. २ मार्च २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय, परतूर येथे आयोजित बैठकीत बोलत होत्या. 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' या अभियानाच्या अनुषंगाने सर्व मंडळ अधिकारी व संबंधित महसूल अधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या बैठकीस उपविभागीय अधिकारी परतुर पद्माकर गायकवाड, तहसीलदार परतुर दामोदर जाधव, नायब तहसीलदार संजय चंदन यांच्यासह अन्य विभागातील अधिकारी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी मित्तल यांनी सांगितले की, हे अभियान ७ मार्च ते १५ मे २०२६ या कालावधीत मंडळ तसेच नगर परिषद/ नगर पंचायत स्तरावर राबविण्यात येणार आहे. सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांचे महसूल विषयक प्रश्न तात्काळ निकाली काढणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. प्रत्येक तालुक्यात एकदिवसीय समाधान शिबिरे आयोजित करून प्रलंबित फेरफार, ७/१२ दुरुस्ती, उत्पन्न, रहिवासी व जात प्रमाणपत्रे यांसारख्या सेवा 'सिंगल डे सर्व्हिस डिलिव्हरी' तत्त्वावर देण्यात याव्यात, असे त्यांनी स्पष्ट केले. पूर्वतयारीवर भर:–अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी गावनिहाय प्रलंबित प्रकरणांची यादी तयार करून शिबिरापूर्वी आवश्यक कार्यवाही पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. ७/१२ व ८अ उताऱ्यांचे अद्ययावतीकरण, डिजिटल ७/१२ संदर्भातील जनजागृती तसेच एकवेळच्या अधिमूल्य भरणा पद्धतीबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यास सांगितले. तुकडेबंदी कायद्याशी संबंधित प्रकरणे, भूसंपादन व अकृषी परवानगी नोंदींची अद्ययावत माहिती शिबिरात उपलब्ध करून द्यावी. तसेच 'एक खिडकी व्यवस्था' प्रभावीपणे राबवून सर्व महसूल अधिकारी एकाच ठिकाणी उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी नमूद केले. शिबिरांची व्यापक प्रसिद्धी करण्यासाठी सोशल मीडिया, स्थानिक प्रसारमाध्यमे तसेच दवंडीचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले.

# संघर्षयोद्धा बबनराव ढाकणे स.सा. कारखाना गळीत हंगाम यशस्वी पूर्ण

पाथर्डी । प्रतिनिधी

केदारेश्वर सहकारी साखर कारखाना येथे संघर्षयोद्धा बबनराव ढाकणे यांच्या नेतृत्वाखालील गळीत हंगामाची यशस्वी सांगता नुकतीच उत्साहात पार पडली अत्यंत प्रतिकूल परिस्थिती आर्थिक अडचणी तांत्रिक अडथळे आणि विविध प्रशासकीय प्रक्रियांमुळे यंदाचा गळीत हंगाम सुरू होईल की नाही याबाबत शेतकरी कामगार आणि सभासदांमध्ये मोठी साशंकता निर्माण झाली होती.

मात्र कारखान्याच्या व्यवस्थापनाने आणि सहकाऱ्यांनी जिद्द चिकाटी आणि नियोजनाच्या जोरावर सर्व अडचणींवर मात केली हंगामाला तब्बल एक महिना उशिराने सुरुवात होऊनही कारखान्याने २ लाख



टनांहून अधिक ऊस गाळप करून उल्लेखनीय कामगिरी बजावली या यशामागे ऊसउत्पादक शेतकरी ऊसतोडणी कामगार ट्रान्सपोर्ट कंत्राटदार तसेच कारखान्याचे अधिकारी व कर्मचारी यांचे मोलाचे योगदान असल्याचे व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले प्रतिकूल हवामान वाहतूक अडचणी आणि ऊस उपलब्धतेतील चढउतार असूनही सर्व घटकांनी दाखवलेल्या एकजुटीमुळेच हा हंगाम यशस्वी ठरल्याचे प्रतिपादन ॲड प्रताप ढाकणे यांनी केले यावेळी सहकार विभागाचे प्रादेशिक साखर संचालक संजय गोंदे विशेष लेखापरीक्षक द्वारकानाथ पवार तसेच पाथर्डी–शेवगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या शुभहस्ते विधीवत पूजन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली यावेळी कारखान्याचे अध्यक्ष ॲड प्रताप ढाकणे चेअरमन ऋषिकेश ढाकणे प्रशासकीय अधिकारी पोपट केदार माधवराव काटे रमेश गर्जे तसेच शेतकरी ऊसतोडणी कामगारांचे मुकादम सभासद व स्थानिक मान्यवर उपस्थित होते.

# सराफा दुकान फोडून व वाहन चोरणारा अट्टल गुन्हेगार पकडला; पावणे दोन किलो चांदी जप्त

**अंबड । प्रतिनिधी**

**अंबड शहरामध्ये सराफा दुकान फोडून चोरी करणारा गुन्हेगाराला अंबड पोलिसांनी पकडले सदरील आरोपीकडून तब्बल पावणे दोन किलो चांदी व एक मोटार सायकल जप्त करण्यात आली. याप्रकरणी पोलीस ठाणे अंबड जि.जालना येथे गु.र.न.२५/२०२६ कलम ३०५,३३१(४),३(५) बि.एन.एस.प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्यातील आरोपीतांनी अंबड येथील फिर्यादी विनोद चित्राल यांचे सराफा लाईन येथील राघव ज्वेलर्स सराफा दुकान फोडुन त्यातुन सोन्या चांदीचा माल चोरुन नेला होता. सदर गुन्ह्यांचा तपास करत असताना आरोपी बाळु शिरसाठ रा. कुंभेफळ ता.जि. जालना यास अटक करुन तपास केला असता त्याचे सोबत दोन फरार साथीदार संतोष ओंकार गायकवाड रा. तलवाडा ता. गेवराई जि.बिड व त्याच्या साथीदारांनी मिळून हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले होते.**

आरोपी निष्पन्न झाल्यापासून अंबड




पोलीस सदर आरोपीतांचा कसोशिने शोध घेत असताना माहिती मिळाली की, सदर गुन्ह्यातील मास्टर माइंड आरोपी संतोष ओंकार गायकवाड रा. तलवाडा ता. गेवराई जि.बिड हा दिनांक २७/०२/२०२६ रोजी रात्री दिड ते दोन वाजेच्या सुमारास मौजे कुंभेफळ ता. जालना येथील शेतवस्तीवर आल्याची गोपणीय बातमीदारामार्फत माहिती मिळाल्याने मा. पोलीस निरीक्षक श्री संतोष घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे चे डी.बी. पथक प्रमुख पोउपनि बी.बी.नरोडे व सोबत पोहेकॉ/११६९ यशवंत मुंडे, पोहेकॉ/१२७२ दिपक पाटील, पोकॉ ३४४ अरुन मुंडे, पोकों/७८० तुकाराम मदन, यांनी तिन किलोमिटर पायी कुंभेफळ येथील शेत वस्तीवर जावुन आरोपी झोपलेल्या रुमच्या चारही बाजुने घेराव घालत असताना आरोपीला पोलीसांची चाहुल लागल्याने आरोपी रुमच्या मागच्या दरवाज्याने पळुन जात असताना पोकों – अरुण मुंडे तुकाराम मदन यांनी दोन ते अडिच किलोमीटर रात्रीच्या अंधारात पाठलाग करुन त्यास शिताफीने ताब्यात घेतले व पुढील तपासकामी पोलीस ठाणे अंबड येथे घेवुन आले असता सदर आरपीला विश्वासात घेवून विचारपुस केली असता यातील आरोपी राघव ज्वेलर्स अंबड येथे त्याच्या दोन साथीदारांच्या मदतीने चोरी केल्याची कबुली दिली असुन सदर ठिकाणाहुन चोरलेले एकुण १ किलो ७४५ ग्रॅम चांदी व वडीगोद्री येथुन चोरलेली मो.सा.क्र. २१३६९५ हि जप्त केली आहे. सदर गुन्ह्याचा तपास अमोल गुरले हे करीत असुन मा. न्यायालयाने सदर आरोपीस४ मार्च पर्यंत पोलीस कस्टडी दिल्याने आरोपीस विश्वासात घेवुन विचारपुस केली असता आरोपीने घनसावंगी पो.स्टे. हद्दीतील रांजनी येथील सुदर्शन मांडवे यांचे सोन्या चांदीचे दुकान तसेच रांजनी येथील कौसर शेख यांची कपड्याची दुकान तसेच पोलीस गोदी हद्दीत वडीगोद्री येथील सुनिल कु–हाडे यांची पैशन प्रो मोटार सायकल तसेच पो.स्टे. शेवगाव जि. अहिल्यानगर येथील टाटा सफारी चार चाकी वाहन चोरी केल्याची कबुली दिली आहे. तसेच सदर चोरीसंदर्भाने विविध पो.स्टे.ला. पोलीस ठाणे घनसावंगी येथे गु.र न. ०३/२०२६ कलम ३३१(४).३०५(३) बि.एन. एस. २. पोलीस ठाणे गोंदी गु.र.न.४११/२०२५ कलम ३०३(२) बि.एन.एस.३. पोलीस ठाणे शेवगाव जि. अहिल्यानगर गु.र.न. १११८/२०२५ कलम ३०३(२) बि.एन. एस. असे गुन्हे दाखल असून आरोपीकडुन अजुनही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक अजय कुमार बन्सल ,अप्पर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे अंबड येथील पोलीस निरीक्षक श्री संतोष घोडके, स.पोनी अमोल गुरले, पो. उपनि भगवान नरोडे पोलीस अंमलदार यशवंत मुंडे, दिपक पाटील, अरुण मुंडे, तुकाराम मदन धनाजी गवळे, विजय केंद्रे, अशोक भांगळ, विनोद भानुसे, देवा डेहंगळ यांनी केली आहे.



# पांगरी गोसावी येथे जिल्हाधिकारी मित्तल यांनी नागरिकाशी साधला संवाद

**जालना। प्रतिनिधी**

**मंठा तालुक्यातील पांगरी गोसावी येथे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी नागरिकांशी संवाद साधला व उपस्थित नागरिकांना छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाची माहिती दिली व अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना शासनाच्या १५ प्रकारच्या सेवा घरपोच मिळणार आहे असे त्यांनी सांगितले. तसेच शिबिराच्या दिवशी रक्तदान शिबीर, रोजगार मेळावा, शासनाच्या विविध योजनांची माहिती देणारे स्टॉल लावण्यात येणार आहेत असे त्यांनी सांगितले. यावेळी उप विभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, तहसीलदार मंठा श्रीमती सुमन मोरे, नायब तहसीलदार श्री. काळदाते यांच्यासह अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.**

# शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार शेतकरी विरोधी कायद्यांची होळी!

## एनडीपीएस कायद्यांतर्गत बदल करून शेतकऱ्यांना गांजा,अफु, तंबाखू लागवडीस परवानगी द्या -डॉ.ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

एनसीबीआरच्या अहवालानुसार सन २०२३ मध्ये भारत देशात १०,७०० शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन त्यात महाराष्ट्र राज्यात ३८.५ टक्के प्रमाण असुन महाराष्ट्र पहिल्या स्थानावर आहे. मराठवाड्यात गेल्या सन २०२५ वर्षात ११२९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन बीड जिल्ह्यात २५६ शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन नव वर्षाच्या सुरुवातीला दिड महिन्यात ३९ शेतकऱ्यांनी आत्महत्यांची नोंद आहे. सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांमुळे आणि शेतकरी विरोधी कायद्यांमुळे आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे.याच्या निषेधार्थ आणि शेतकऱ्यांचे आर्थिक जिवनमान उंचावत शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी एनडीपीएस कायद्यात बदल करून शेतकऱ्यांना गांजा,अफु,तंबाखु लागवडीसाठी रीतसर परवानगी देण्यात यावी या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.०२ होळी दिवशी सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकरी विरोधी कायद्यांची होळी करत सरकार विरोधी धोरणांच्या निषेधार्थ बोंबा ठोकत लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. निवेदन जिल्हाधिकारी यांच्या हस्ते राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय कृषिमंत्री, राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना देण्यात आले.यावेळी आंदोलनात रामनाथ खोड,शेख युनुस,सुदाम तांदळे,शेख मुबीन, बाळासाहेब मोरे पाटील (प्रांताध्यक्ष शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच) माजी सैनिक अशोक येडे ( बीड जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी) ,रामधन जमाले ( बीड जिल्हाध्यक्ष इंटक), कुलदीप करपे(बीड जिल्हाध्यक्ष क्रांतिकारी शेतकरी संघटना), सुहास जायभाये ( बीड जिल्हा कोषाध्यक्ष डीवायएफआय), डॉ.संजय तांदळे ( अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ता संघटना बीड), प्राचार्य डी .जी.तांदळे(बीड अध्यक्ष किसान सभा महाराष्ट्र राज्य),प्रा.कॉ. विठ्ठलराव सवासे (किसान सभा म.रा.बीड ), प्रभाकर धुमाळ, राजेंद्र धुमाळ,माऊली शिंदे जिल्हा सदस्य आम आदमी पार्टी बीड आदी सहभागी होते.



एनसीबीआरच्या अहवालानुसार सन २०२३ मध्ये भारतात १०,७०० शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन महाराष्ट्र सर्वप्रथम क्रमांकावर असुन ३८.५ टक्के प्रमाण आहे. महाराष्ट्रात मराठवाड्यात बीड जिल्ह्यात गेल्या वर्षी २५६ शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन नविन वर्षाच्या सुरुवातीला दिड महिन्यात ३९ शेतकऱ्यांनी मृत्युला कवटाळले आहे. निसर्गाची अवकृपा,,वाढता उत्पादन खर्च, शेतीमालाला योग्य भाव नसणे, शेतीमालाला निर्यातबंदी आणि कर्जबाजारीपणा या शेतकरी विरोधी धोरणा बरोबरच कमाल शेतजमीन धारणा कायदा, आवश्यक वस्तु कायदा, जमिन अधिग्रहण कायदा हे नरभक्षी कायदे रद्द करण्यात यावेत.शेतीमालाला निर्यातबंदी कायमची रद्द करावी. तसेच शेतीमालाला भाव मिळत नसल्याने एनडीपीएस कायद्यांतर्गत बदल करून शेतकऱ्यांना सशर्त गांजा,अफु, तंबाखू लागवडीस परवानगी देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.

# सोळा गुंठे जमीन प्रकरणी उच्च न्यायालयाचा आदेश

## मावेजा न दिल्याने अवमान याचिका दाखल

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेविरोधात सोळा गुंठे जमीन रस्त्यामध्ये गेल्याच्या प्रकरणी माननीय उच्च न्यायालय, संभाजीनगर खंडपीठाने जमीनमालकांच्या बाजूने निकाल देत नगरपालिकेला सहा आठवड्यांच्या आत मावेजा अदा करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. संबंधित जमीन नवनाथ शिराळे व गोरख शिराळे यांच्या वडिलांची असून ती रस्त्यात समाविष्ट करण्यात आली होती.

न्यायालयाच्या आदेशानुसार नगरपालिकेने तात्काळ मावेजा देणे अपेक्षित असताना अद्यापही रक्कम अदा करण्यात आलेली नाही. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशाचे पालन न झाल्याने नवनाथ शिराळे व गोरख शिराळे यांनी माननीय उच्च न्यायालय, संभाजीनगर खंडपीठात अवमान याचिका दाखल केली आहे.

दरम्यान, संबंधित प्रकरणात रस्ता अडविण्यात आला आहे अशी चर्चा काही ठिकाणी होत असली तरी शिराळे बंधूंनी कोणताही रस्ता अडविलेला नसल्याचा स्पष्ट खुलासा करण्यात आला आहे. उलट नगरपालिकेच्या गुत्तेदाराने रस्त्याचे काम अपूर्ण ठेवले असल्याचे सांगण्यात आले.नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांनी मावेजा देण्यास उदासीनता दाखविल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. न्यायालयाच्या आदेशाचे तातडीने पालन करून मावेजा अदा करावा आणि रखडलेले रस्त्याचे काम पूर्ण करावे, अशी मागणी संबंधितांकडून करण्यात येत आहे.या संदर्भात काल झालेल्या विशेष अर्थसंकल्पीय सभेमध्ये नगराध्यक्ष, मुख्याधिकारी तसेच बीड शहरातील सर्व सन्माननीय नगरसेवकांसमोर विषय मांडण्यात आला. न्यायालयीन आदेशाचा सन्मान राखत नागरिकांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.न्यायालयाने आमच्या बाजूने स्पष्ट आदेश दिला आहे. आम्ही रस्ता अडविलेला नाही. फक्त योग्य तो मावेजा मिळावा हीच आमची मागणी आहे, असे संबंधितांनी सांगितले.नागरिकांमध्ये या प्रकरणाची चर्चा सुरू असून, आता नगरपालिकेकडून काय भूमिका घेतली जाते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सामाजिक जाणिवेतून सायकल वाटप

## शैक्षणिक विकासासाठी गट-तट विसरा -आ. सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी निधनाच्या पार्श्वभूमीवर वाढदिवस साधेपणाने व सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्याचे आवाहन मान्य करत केळसांगवी येथील माजी सरपंच गंगाधर पडोळे यांनी गरजू शालेय विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप केले. या उपक्रमाचे कौतुक करत आमदार सुरेश धस यांनी कार्यकर्त्यांनी सामाजिक भान जपत गावाच्या शैक्षणिक विकासासाठी गट-तट बाजूला ठेवून एकत्रित काम करण्याचे आवाहन केले.



आ. धस यांच्या वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च टाळून जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांना सायकलींचे वितरण करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी लांब अंतर पार करावे लागते. अशा परिस्थितीत सायकल ही त्यांच्यासाठी शिक्षणाची महत्त्वाची सोय ठरत असून या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला गती मिळणार आहे.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना आ. धस म्हणाले की, जिल्हा परिषद शाळा या गोरगरीब विद्यार्थ्यांचे ज्ञानमंदिर असून त्या टिकल्या पाहिजेत, वाढल्या पाहिजेत आणि आधुनिक सुविधांनी सुसज्ज झाल्या पाहिजेत. शाळा खोल्यांसाठी निधी उपलब्ध करून देणे, पायाभूत सुविधा सुधारणा ◀◀ पान ३ वर

# वडवणी नगरपंचायत विषय समित्यांची निवडणूक बिनविरोध

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी नगरपंचायतीच्या विविध विषय समित्यांची निवडणूक दि.२७अधिकाऱ्यांनी फेब्रुवारी २०२६ शुक्रवार रोजी माजलगांवचे उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांच्या अध्यक्षतेखाली आणि न.पं.चे मुख्याधिकारी पोपट निगळ यांच्या उपस्थितीत अत्यंत शिस्तबध्द व शांततेच्या वातावरणात बिनविरोध पार पडली. या निवडणूक प्रक्रियेदरम्यान सर्व सदस्यांनी एकमताने सहमती दर्शविल्याने




कोणतीही चुरस न होता निवडणूक सुरळीतरीत्या पूर्ण झाली. आमदार प्रकाश सोळंके व जयसिंग सोळंके बांधकाम समिती सभापतीपदी गटनेते अस्लम कुरेशी यांची निवड यांच्या सूचनेनुसार सक्षम, अनुभवी आणि कार्यक्षम पदाधिकाऱ्यांची विविध समित्यांवर नियुक्ती करण्यात आली. शहराच्या सर्वांगिण विकासासाठी अनुभवी ◀◀ पान ३ वर

# संत बंकटस्वामी महाराजांच्या दिंडीचे बुधवारी पैठणकडे प्रस्थान

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील ७७ वर्षाची अखंड परंपरा असलेल्या संत बंकटस्वामी महाराज यांच्या पालखीसह दिंडीचे बुधवारी दि ४ मार्च रोजी श्रीक्षेत्र नेकनूर येथून श्री क्षेत्र पैठण कडे प्रस्थान होणार आहे. यां दिंडीत सर्व भाविक भक्तांनी सहभागी व्हावे असे आवाहन महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी केले आहे.

संत एकनाथ महाराजांच्या जलसमाधी सोहळ्या निमित्त श्री क्षेत्र पैठण येथील नाथषष्ठी



यात्रेसाठी ◀◀ पान ३ वर

# नशामुक्त भारत अंतर्गत तंबाखूजन्य पदार्थाची व नशांच्या पदार्थांची होळी

बीड । प्रतिनिधी

दिनांक ०२/०३/२०२६ रोजी संस्कृती विद्यालय नगर रोड बीड येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान बीडल,नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य , जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद बीड . यांच्या संयुक्त विद्यमाने आज बीड शहरातील संस्कृती विद्यालय या शाळेच्या प्रांगणात तंबाखूजन्य पदार्थाची प्रतिकात्मक होळी करण्यात आली यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दत्ता नलावडे ,तत्त्वशील



कांबळे ज्योती गायकवाड आदी उपस्थित होते

समाजामधील युवकांमध्ये व विद्यार्थ्यांमध्ये व्यसनाचे प्रमाण वाढत आहेत जाहिरातीच्या माध्यमातून व्यसनाकडे युवकांचे आकर्षण वाढत आहे व्यसनामुळे समाजामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे त्यामुळे किशोरवयीन वयामध्ये बालकांना व्यसनांचे दुष्परिणाम समजावून सांगणे गरजेचे आहे मुळातच व्यसनच लागू नये याकरिता शाळा महाविद्यालयामध्ये प्रयत्न करणे खूप गरजेचे आहे विद्यार्थी ,महिला व युवकांमध्ये वाढते व्यसनाचे व तंबाखूचे प्रमाण हे जीवनास हानिकारक आहे कॅन्सरचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे किशोरवयीन बालके ही विविध प्रकारचे व्यसन करत आहेत व्यसनाचे दुष्परिणाम जीवनात खूप ठिकाणी जाणवत आहे ते कमी व्हावे म्हणून प्रत्येक माणसाने आपल्या जीवनात व्यसन बंद केले पाहिजे त्यामुळे ◀◀ पान ३ वर

# पाटोदा येथील अंगणवाडी क्रमांक ८ मध्ये टीव्ही संचाचे थाटात उद्घाटन



पाटोदा । प्रतिनिधी

येथील अंगणवाडी क्रमांक ८ मधील चिमुकल्यांच्या डिजिटल शिक्षणासाठी टीव्ही संच उपलब्ध करून देण्यात आला असून, याचा लोकार्पण सोहळा आज मोठ्या उत्साहात पार पडला. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने बालकांना शिक्षण मिळावे, या उद्देशाने हा स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला आहे.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून. मा. एल आर जाधव माजी मुख्याध्यापक राजु जाधव, महादेव जाधव आणि बालाजी जाधव साहेब उपस्थित होते. त्यांच्या हस्ते फित कापून टीव्ही संचाचे रीतसर उद्घाटन करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी अंगणवाडीतील सुविधांचे कौतुक करत डिजिटल शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.

याप्रसंगी हनुमंत काळे , गणेश ◀◀ पान ३ वर

# तरुणांच्या गाडीचा भीषण अपघात; एक ठार, तिघे गंभीर

बीड । प्रतिनिधी

बीड शहरावर होळीच्या दिवशी शोककळा पसरली आहे. धुलिवंदनाचा सण साजरा करण्यासाठी रिसॉर्टकडे निघालेल्या तरुणांच्या कारचा पहाटेच्या सुमारास भीषण अपघात झाला. भरधाव वेगातील कारने तीन-चार पलट्या घेतल्या आणि काळजाचा थरकाप उडाला. या भीषण अपघातात २२ वर्षीय कृष्णा मुळे या तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर त्याचे मित्र गंभीर जखमी झाले आहेत.

भीषण अपघाताच्या दुःखद घटनेने होळीच्या सणाच्या दिवशी बीड शहरावर शोककळा पसरली आहे. धुलिवंदन साजरा करण्यासाठी मित्रांसोबत रिसॉर्टवर जाण्याचे स्वप्न पाहणाऱ्या एका तरुणाचा प्रवासातच करुण अंत झाला. बीड-शिरूर रोडवरील नागऱ्याचीवाडी येथे सोमवार, २ मार्च रोजी पहाटेच्या सुमारास भरधाव कारचा भीषण अपघात झाला. या अपघातात कृष्णा जालिंदर मुळे (वय- २२ वर्षे) हा तरुण जागीच ठार झाला असून, त्याचे तीन मित्र गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, बीड शहरातील रामतीर्थ परिसरातील काही तरुण धुलिवंदन साजरा करण्यासाठी परजिल्ह्यातील एका रिसॉर्टवर जाण्यासाठी निघाले होते. यासाठी व्हेरना आणि थार अशा दोन गाड्यांमधून हा मित्रपरिवार बीडहून शिरूर कासारमार्गे जात होता. पहाटेच्या वेळी रस्ते मोकळे असल्याने गाड्यांचा वेग जास्त होता. नागऱ्याचीवाडी परिसरात पोहोचताच व्हेरना कारवरील चालकाचे नियंत्रण सुटले. नियंत्रण सुटलेली ही कार रस्त्यावरून तीन-चार वेळा पलटी झाली आणि शेतातील एका विहिरीच्या कठड्याला जाऊन जोरदार धडकली.

अपघात इतका भीषण होता, की कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. सुदैवाने, कार विहिरीच्या कठड्याला धडकून थांबली; अन्यथा ती थेट विहिरीत कोसळली असती आणि मोठा अनर्थ घडला असता. मात्र, या धडकेत गाडीतील कृष्णा मुळे याला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.



# देवगाव येथिल कृषी तंत्र विद्यालयातील विद्यार्थ्यांचे जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धेत यश

केज । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत सर्व कृषी तंत्र विद्यालयाच्या संयूक्त विद्यामानाने दोन दिवसीय बीड जिल्हा स्तरीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन बीड येथील कृषी तंत्र विद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले होते.या स्पर्धेत देवगाव येथिल कृषी तंत्र विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये सहभाग नोंदवत यश मिळवले आहे.

या स्पर्धेचा शुभारंभ माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या हस्ते तर डॉ.भगवान आसेकर सं.शिक्षण तथा अधिष्ठाता वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी यांच्या प्रमुख उपस्थितीत व डॉ.राजेंद्र लोंढे ◀◀ पान ३ वर


**राज्य लोकतंत्र**

**प्रकट निवेदन**

**रेग्युलेशन ऑफ न्युज पेपर निवेदन तक्ता ४ (सेंट्रल रुल्स १९५६, नियम क्र.८) अन्वये राज्य लोकतंत्र वृत्तपत्राची मालकी व इतर तपशिलासंबंधी निवेदन.**

| | |
|---|---|
| **१) प्रकाशनाचे स्थळ** | : राजीव गांधी चौक, जाधव बिल्डींग, दुसरा मजला, बीड |
| **२) प्रकाशन स्वरूप** | : दैनिक |
| **३) मुद्रकाचे नाव** | : सिमा भिमराव मस्के |
| भारताचे नागरिक आहे काय? | : होय |
| **४) प्रकाशकाचे नाव** | : सिमा भिमराव मस्के |
| भारताचे नागरिक आहे काय? | : होय |
| पत्ता | : मु.पो.पालवन ता.जि.बीड महाराष्ट्र-४३११२२ |
| **५) संपादकाचे नाव** | : सिमा भिमराव मस्के |
| भारताचे नागरिक आहे काय? | : होय |
| पत्ता | : मु.पो.पालवन ता.जि.बीड महाराष्ट्र-४३११२२ |
| ६) एकुण भागभांडवलपैकी १ टक्क्यापेक्षा अधिक भागभांडवल असलेल्यांचे नावे | : निरंक |

**मी सिमा भिमराव मस्के** याद्वारे जाहीर करते की वर दिलेला तपशील माझ्या माहिती प्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे खरा आहे.

दि.३ मार्च २०२६

**सिमा भिमराव मस्के**
संपादकची स्वाक्षरी


# आदित्य एज्युकेशन ग्रुपचा जल्लोष, वार्षिक स्नेहसंमेलन ५ ते १४ मार्चदरम्यान रंगणार

## विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव, संघभावना, आणि नेतृत्वगुणांचा विकास स्नेहसंमेलनातूनच होतो- डॉ. आदिती सारडा

बीड । प्रतिनिधी

शिक्षण क्षेत्रात नामांकित आदित्य एज्युकेशन ग्रुप, बीड अंतर्गत कार्यरत असलेल्या विविध महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने 'जल्लोष १०.०' हे भव्य, उत्साहपूर्ण, एकत्रित वार्षिक स्नेहसंमेलन ५ ते १४ मार्चदरम्यान, असे १० दिवस रंगणार आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे हे स्नेहसंमेलन उत्साह, स्पर्धा, कला, संस्कृती कार्यक्रमांचे अनोखे संमेलन ठरणार आहे. विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देणे, संघभावना वाढवणे, त्यांच्यातील नेतृत्वगुणांचा विकास घडवण्याचे काम वार्षिक स्नेहसंमेलनातूनच होते. असे मत आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सुभाषचंद्र सारडा यांनी व्यक्त केले.

आदित्य एज्युकेशन ग्रुपच्या स्नेहसंमेलनामध्ये क्रीडा, सांस्कृतिक, कला, मनोरंजनात्मक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. आदित्य एज्युकेशन ग्रुप अंतर्गत असलेल्या सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी मोठ्या उत्साहाने या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

क्रीडा स्पर्धांची होणार रंगत

जल्लोष १०.० अंतर्गत विविध मैदानी व इनडोअर क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये कबड्डी, खो-खो, क्रिकेट, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, रस्सीखेच आदी खेळांचा समावेश असून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती, शिस्त, सांघिक खेळाचे महत्त्व अधोरेखित केले जाणार आहे.

सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

नृत्य, गायन, एकांकिका, समूहगीत, वाद्यवृंद, फॅशन शो, पारंपरिक लोककला, विविध वेशभूषा, आधुनिक कला प्रकारांचे सादरीकरण होणार आहे. विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या सादरीकरणामुळे संपूर्ण परिसरात उत्सवाचे वातावरण निर्माण होणार आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# जय पवारांनी शेअर केलेला व्हिडिओ मी पाहिला; हवाई उड्डाणमंत्री मुरलीधर मोहोळांकडून दखल

**पुणे । प्रतिनिधी**

राज्याचे दिवंगत उमुख्यमंत्री अजित पवारांच्या विमानाला २८ जानेवारीला झालेल्या अपघातात अजित पवारांसह ५ जणांचा मृत्यू झाला. या घटनेनं देशरात शोककळा पसरली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही अपघाताची गंभीर दखल घेत तपासाची मागणी हवाई मंत्रालयाकडे केली आहे. मात्र, अपघाताच्या १ महिन्यानंतरही संशयाचे धुके कायम आहेत. त्यातच, विमान अपघात चौकशी प्राधिकरणाकडून २२ पानांचा प्राथमिक अहवाल सादर करण्यात आला. तर, दुसरीकडे आमदार रोहित पवार यांच्याकडून व्हीएसआर कंपनीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी केली जात आहे. आता, अजित पवारांचे सुपुत्र जय पवार यांनी एक व्हिडिओ शेअर करत कंपनी मालकावर प्रश्न उपस्थित केले आहेत. जय पवार यांच्या या व्हिडिओची दखल हवाई



राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ (चींश्रळवहरी ोहेश्र) यांनी घेतली आहे.

अजित पवार यांच्या विमान दुर्घटनासंदर्भात आलेल्या अहवालात सुरुवातीला हे विमान झाडावर आदळलं, त्यानंतर जमिनीवर कोसळलं. ही घटना घडली तेव्हा बारामती विमानतळावर ३ हजार मीटर दृश्यमानता होती, असं अहवालात नमूद करण्यात आलं आहे. तर, उड्डाणापूर्वी पायलटनं मद्यपान केलं नव्हतं, असंही अहवालात म्हटलंय.

दरम्यान, अजित पवार यांचे पुत्र जय पवार यांनी एक धक्कादायक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. यामध्ये तडठ चे मालक रोहित सिंह मुख्य पायलटच्या सीटवर उड्डाणादरम्यान झोपलेले असल्याचा दावा जय पवार यांनी केला आहे. आता, या व्हिडिओवर नागरी उड्डाणमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

जय पवार यांनी शेअर केलेला व्हिडिओ मी पाहिला आहे. मी तो व्हिडिओ पाहिला आहे, योग्य ती दखल घेतली जाणार, असे मंत्री मोहोळ यांनी म्हटले. दरम्यान, आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीत बोलताना, देश पातळीवर अनेक पर्यटक अडकलेले आहेत, हवाई उड्डाण मंत्रालयाकडून त्याची योग्य ती दखल घेतली जाणार आहे. विमानसेवा सुरू झाल्यानंतर सर्व पर्यटकांना आणले जाईल, आमच्या खात्याची ती जबाबदारी आहे, असे मुरलीधर मोहोळ यांनी म्हटले.

एअरपोर्ट कनेक्टिव्हिटीसाठी प्रयत्न करणार

केंद्रीय प्रकल्पामध्ये केंद्रीय पातळीवरील प्रकल्पांचा आजच्या बैठकीत आढावा घेतला जाणार आहे. त्यामध्ये जायका, मेट्रो, नदी सुधार प्रकल्पाचा बैठकीत आढावा घेतला जाणार आहे. नवीन मार्गाची कनेक्टिव्हिटी, नवीन मेट्रो मार्गाची विमानतळाशी कनेक्टिव्हिटीसाठी प्रयत्न केले जाणार आहेत, अशी माहितीही मोहोळ यांनी दिली.

# मुळशीत कुस्तीचा थरार! शिवराज राक्षे आणि विरेंद्र कुमार सिंह आमनेसामने

**पुणे । प्रतिनिधी**

मुळशी तालुक्यातील करमोळी येथे होळी उत्सवानिमित्त 'श्री कालभैरवनाथ कुस्ती दंगल २०२६' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, दि. ३ रोजी सायंकाळी ४ नंतर ही भव्य कुस्ती स्पर्धा रंगणार असल्याची माहिती संस्थापक संदीप राजेंद्र केदारी यांनी दिली. या दंगलीतील पहिल्या क्रमांकाची मानाची कुस्ती डबल महाराष्ट्र केसरी किताब पटकावलेले शिवराज राक्षे आणि भारत केसरी विजेते विरेंद्र कुमार सिंह यांच्यात होणार आहे. या मानाच्या कुस्तीसाठी निलेश आल्हाट, अनिल जाधव, विशाल शेळके आणि निलेश सुर्वे यांच्या वतीने ३ लाख ५१ हजार रुपयांची गदा जाहीर करण्यात आली आहे.

याशिवाय अभिजित भोईर विरुद्ध कुमार माने, संकेत ठाकूर विरुद्ध अभि शेडगे, अमित कंधारे विरुद्ध तेजस मारणे अशा प्रमुख लढती रंगणार आहेत. महिला गटात श्रेया परदेशी विरुद्ध रुपाली वाघ, ईश्वरी मेंगडे विरुद्ध मीनाक्षी चोरगे तसेच वेदिका कालेकर विरुद्ध अंतरा कंधारे यांच्या कुस्त्या होणार असून एकूण ३५ हून अधिक कुस्त्या पार पडणार आहेत. कार्यक्रमाचे आयोजन शरद केदारी, अमोल केदारी, दिनेश केदारी, महेश अल्हाट, सचिन केदारी, प्रणित केदारी, दिलीप केदारी, अनिल केदारी, आदेश केदारी, समीर




केदारी, तुषार जाधव, दिगंबर केदारी, समीर प्रभाकर केदारी, शशिकांत जायगुडे, सुहास केदारी, रवींद्र जायगुडे, ऋषिकेश जाधव तसेच समस्त ग्रामस्थ करमोळी यांच्या वतीने करण्यात आले आहे. पंच म्हणून दत्ता रुकर, रोहिदास आमले आणि विक्रम पवळे काम पाहणार आहेत. कुस्तीमध्ये सहभागासाठी संतोष ज्ञा. केदारी यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. या वेळी आमदार शंकर मांडेकर, मुळशी तालुका कुस्तीगीर संघ तालीमचे अध्यक्ष गोविंद आंग्रे, मधुर दाभाडे (समन्वयक, काँग्रेस कमिटी मुळशी), बाबाजी शेळके, रमेश केदारी आणि राजेंद्र दोशी उपस्थित राहणार आहेत. तसेच नवनिर्वाचित जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचा सन्मानही करण्यात येणार असल्याचे संदीप केदारी यांनी सांगितले.

# पुण्यातील कॉलेजचे ८० विद्यार्थी दुबईत अडकले; पालक चिंतेत

**पुणे । प्रतिनिधी**

अमेरिकेनं इराणवर हल्लाबोल केल्यानंतर जागतिक स्तरावर या युद्धजन्य परस्थितीचे परिणाम पाहायला मिळत आहेत. त्यातच, आखाती देशांमध्ये हवाई वाहतुकीवर याचा परिणाम झाला असून अनेक विमानांचे उड्डाण रद्द करण्यात आलंय. येथील युद्धसंघर्षाचा परिणाम दुबईवरही झाल्याने दुबई विमानतळावरुन उड्डाण घेणारी अनेक उड्डाणं रद्द करण्यात आली आहेत. त्यामुळे, अनेक भारतीय नागरिक, प्रवासी दुबईत (ऊींलरळ) अकडून पडले आहेत. इकडे देशात त्यांचे कुटुंबीय काळजीत पडले असून मुलांच्या सुखरुप घरी पोहोचण्याची वाट पाहत आहेत. विशेष म्हणजे पुण्यातील (झीपश) एका कॉलेजची शैक्षणिक सहलही दुबईला गेली असून या सहलीतील ८० विद्यार्थी तिकडे अडकले आहेत.



पुण्यामध्ये एमबीए करणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल दुबईमध्ये गेली असून ८० विद्यार्थी या सहलीमध्ये सहभागी झाले होते. दुबईत गेलेले हे सर्व विद्यार्थी १ मार्च रोजी विमानाने भारताकडे परतीचा प्रवास करणार होते. परंतु, ऐनवेळी दुबईतील विमानसेवा बंद झाल्याने हे सर्व ८० विद्यार्थी दुबईमध्ये अडकले आहेत. सध्या ते सुखरूप असून आई-वडील मात्र त्यांच्या काळजीत आहेत. हिंगोलीतील खुशी बढेरा ही विद्यार्थीने याच ८० विद्यार्थ्यांसोबत दुबईमध्ये अडकलेली आहे. खुशीच्या वडिलांनी केंद्र शासनाला विनंती केली आहे की, युक्रेनप्रमाणेच विशेष मोहीम राबवत या ८० विद्यार्थ्यांना केंद्र शासनाने मायदेशी परत आणावे.

रायगड जिल्ह्यातील उत्कर्षही अडकला

ग्लोबल एमबीएच्या सहा महिन्यांच्या अभ्यासक्रमासाठी दुबई येथे गेलेला रायगड जिल्ह्यातल्या सुधागड तालुकामधील उत्कर्ष मपारा हाही दुबईत अकडला असून सध्या सुरक्षित आहे. तो कुटुंबीयांशी सातत्याने संपर्कात असल्याची माहिती त्यांचे वडील राजेश मपारा यांनी दिली आहे. उत्कर्ष मपारा हा १८ फेब्रुवारी रोजी दुबईत दाखल झाला असून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी ते शिक्षणासाठी वास्तव्यास आहे. मध्य पूर्वेत निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे कुटुंबीयांमध्ये स्वाभाविकच चिंता आहे. मात्र, उत्कर्ष स्वतंत्रपणे रूम घेऊन राहत असून तो सुरक्षीत असल्याचे त्याच्या वडिलांनी सांगितले. आम्ही सर्वजण सतत उत्कर्षच्या संपर्कात आहोत, तो सुरक्षित आहे. मात्र, पालक म्हणून काळजी वाटतेच, असे त्याच्या पालकांनी सांगितले दरम्यान, सध्याच्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे परदेशात शिक्षणासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत पालकांमध्ये चिंता वाढली असून, परिस्थितीवर लक्ष ठेवत सरकारने आवश्यक ती खबरदारी घ्यावी, अशी विनंती पालकांकडून केली जात आहे.

# युद्धाची भविष्यवाणी खरी ठरली; पुण्यातील ज्योतिषी गौरव देशपांडे यांचा विडिओ व्हायरल

**पुणे । प्रतिनिधी**

सध्या इराण आणि अमेरिका यांच्यात जो तणाव निर्माण झाला आहे, तो केवळ राजकीय कारणांमुळे नसून त्याला एक ज्योतिषीय पार्श्वभूमी असल्याचे सांगितले जात आहे. देशपांडे पंचांगात यासंदर्भात दीड वर्षापूर्वीच काही महत्त्वाची भाकिते वर्तवण्यात आली होती, जी आता खरी ठरताना दिसत असल्याचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

३ मार्च रोजी होणाऱ्या चंद्रग्रहणाचे परिणाम अत्यंत गंभीर असल्याचे भाकीत देशपांडे पंचांगाच्या छापील प्रतीमध्ये आधीच देण्यात आले होते. या ज्योतिषीय विश्लेषणानुसार, 'म्लेच्छ' म्हणजेच प्रामुख्याने इस्लामिक राष्ट्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर उत्पात आणि अशांतता निर्माण होईल, असे नमूद केले होते. तसेच, एखाद्या ख्यातनाम राजकीय



व्यक्तीचा घातपाती मृत्यू होईल, असे स्पष्ट संकेत दीड वर्षापूर्वीच देण्यात आले होते. सध्याची इराणमधील परिस्थिती या भाकिताला दुजोरा देताना दिसत आहे, असे पंचांगकर्ते त्यांच्या व्हिडिओमध्ये सांगताना दिसतात. पंचांगकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, ''खगोलशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर १४ फेब्रुवारीपासून आकाशात महत्त्वाच्या घडामोडी घडत आहेत. १८ फेब्रुवारीला कुंभ राशीत पाच ग्रहांची युती झाली होती, तर सध्या रवी, बुध, मंगळ आणि राहू या चार ग्रहांची युती सुरू आहे. 'ज्योतिषशास्त्र संहिता' ग्रंथांनुसार, 'एका राशीत जेव्हा चार किंवा पाच ग्रह एकत्र येतात, तेव्हा पृथ्वीवर रक्ताचा पूर वाहतो किंवा अतिवृष्टीमुळे जनसंहार होतो.' म्हणजेच ही ग्रहांची स्थिती युद्धजन्य परिस्थिती आणि मोठ्या प्रमाणावरील जीवितहानीचे प्रतीक मानली जाते.'' वराहमिहिर यांनी ग्रहांच्या युतीचे चार प्रकार सांगितले आहेत. यात भेदयुती, अंशुमर्दन, अपसव्य आणि उल्लेख यांचा समावेश आहे. सध्या आकाशात अपसव्य प्रकारची युती पाहायला मिळत आहे. या युतीचे फलित युद्ध भूपानाम असे दिले आहे, ज्याचा अर्थ राजांमध्ये किंवा राष्ट्राध्यक्षांमध्ये युद्ध होणे असा होतो. अमेरिका आणि इराण या दोन बलाढ्य देशांमधील संघर्ष याच युतीचा परिणाम आहे,'' असे मत पंचांगकर्त्यांनी मांडले आहे. पंचांगकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, ''हे युद्धाचे सावट नेमके किती काळ टिकेल, असा प्रश्न सर्वांनाच पडला आहे. ज्योतिषीय गणितानुसार, चंद्रग्रहणाचे परिणाम साधारणपणे पुढील तीन महिन्यांपर्यंत जाणवत राहतात. त्यामुळे येणारे दोन ते अडीच महिने जगाला अशाच प्रकारचा नरसंहार किंवा युद्धजन्य तणाव अनुभवावा लागू शकतो,'' असे त्यांनी सांगितले आहे.

# प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ डॉ. श्यामला वनारसे यांचं निधन

**पुणे । प्रतिनिधी**

प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ आणि बालकारणी डॉ. श्यामला वनारसे यांचे पुण्यात अल्प आजाराने निधन झाले. त्या ८७ वर्षांच्या होत्या. त्यांच्या निधनाने साहित्य, सांस्कृतिक आणि मानसशास्त्र क्षेत्रात शोककळा पसरली आहे. डॉ. श्यामला वनारसे यांनी साहित्य, संगीत, नृत्य, सिनेमा, बालकारण आणि मानसशास्त्र अशा विविध क्षेत्रांत मोलाचे योगदान दिले. मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांत त्यांनी विपुल लेखन केले असून अनेक पुस्तके आणि लेख त्यांच्या नावावर आहेत.

पती दिवंगत डॉ. सुधीर वनारसे यांच्या समवेत डॉ. श्यामला वनारसे यांनी औद्योगिक मानसशास्त्र या विषयावर व्यापक काम केले. अनेक उद्योगसंस्थांबरोबर त्यांनी मानवी संसाधन विकास आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने काम केले. कार्यक्षमता वाढ, संघटनात्मक वर्तन आणि नेतृत्व विकास या



क्षेत्रांत त्यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते. डॉ. श्यामला वनारसे आणि डॉ. सुधीर वनारसे यांनी एकत्र लिहिलेल्या 'स्वभावाला औषध असते' या पुस्तकाला राज्य पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच 'सत्यजित राय' आणि 'भारतीय मन्वंतर' या पुस्तकांनाही राज्य पुरस्कारांनी गौरविण्यात आलं आहे. त्यांच्या साहित्यनिर्मितीत सामाजिक जाण, मानवी मनाचा अभ्यास आणि संस्कृतीविषयक चिंतन यांचा सुंदर संगम दिसून येतो. गरवारे बालभवन, कलाछाया सांस्कृतिक केंद्र आणि अक्षरनंदन अशा अनेक संस्थांच्या जडणघडणीत डॉ. श्यामला वनारसे यांचा मोलाचा वाटा होता. बालविकास आणि सांस्कृतिक जडणघडण या क्षेत्रात त्यांनी दीर्घकाळ काम केलं. डॉ. श्यामला वनारसे यांच्या पश्चात त्यांचा मुलगा रंगकर्मी प्रसाद वनारसे, सून लेखिका मृणालिनी वनारसे आणि मुलगी नर्तिका गौरी वनारसे असा परिवार आहे. रविवारी रात्री उशिरा पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आलं.

# धूलीवंदनानिमित्त ३ मार्चला पुणे मेट्रो अर्धा दिवस बंद, कधी होणार सुरु?

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरातील प्रवाशांसाठी महत्त्वाची सूचना आहे. धूलीवंदन सणाच्या पार्श्वभूमीवर ३ मार्च २०२६ रोजी पुणे मेट्रो सेवा अर्धा दिवस बंद ठेवण्यात येणार आहे. मेट्रो प्रशासनाच्या माहितीनुसार, ३ मार्च रोजी सकाळी ६.०० ते दुपारी ३.०० या वेळेत प्रवासी सेवा पूर्णपणे बंद राहील. दुपारी ३.०० नंतर ते रात्री ११.०० पर्यंत मेट्रो सेवा नियमित वेळापत्रकानुसार सुरू राहणार आहे.

सणाच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची सुरक्षितता आणि आवश्यक सुरक्षाव्यवस्था लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. प्रवाशांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल मेट्रो प्रशासनाने दिलगीर व्यक्त केली आहे. सकाळी ६.०० ते दुपारी ३.०० : मेट्रो सेवा पूर्णपणे बंद

दुपारी ३.०० ते रात्री ११.०० : मेट्रो सेवा नियमित सुरू पर्यायी प्रवासासाठी झचझचङ बस किंवा इतर वाहतूक साधनांचा वापर करण्याचे आवाहन प्रवाशांनी आपल्या प्रवासाचे नियोजन आधीच करून गैरसोय टाळावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पुण्यातील वृद्धाची १० कोटी ७४ लाख रुपयांची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातल्या एका ज्येष्ठ नागरिकाला सीबीआयचे अधिकारी असल्याचे सांगून डिजिटल अरेस्ट करण्यात येणार असल्याची भीती दाखवली आणि त्यांची पावणेअकरा कोटींची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी दोघांना गुन्हे शाखेने अटक केली आहे. महत्त्वाचं म्हणजे दोघांनीही एटीएम मधून पैसे काढल्यामुळे पोलिसांना या दोघांना पकडण्यात यश आलं आहे.

आम्ही सीबीआयमधून बोलतोय तुम्हाला डिजिटल अरेस्ट करण्यात येईल आणि तुमच्या कुटुंबीयांनाही अटक करण्यात येईल, असं सांगून दोघांनी बँक खात्यात तातडीने रक्कम जमा करण्यास सांगितलं. या भीतीपोटी ज्येष्ठ नागरिकांनी १० कोटी ७४ लाख रक्कम या दोघांच्या



अकाउंटमध्ये जमा केले. मात्र काही दिवसांनी आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी शिवाजीनगरमधील सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. संपूर्ण माहिती गोळा केल्यानंतर पोलिसांनी दोघांचा तपास सुरू केला. दोघांनी एटीएममधून पैसे काढल्याचे समजतात पोलिसांनी तपासाचा मार्ग बदलला आणि दोघांनाही एटीएम मध्ये असलेल्या सीसीटीव्हीच्या व्हिडिओच्या माध्यमातून ओळख पटवून अटक केली आहे.

डिजिटल अरेस्ट म्हणजे नेमके काय?

डिजिटल अरेस्ट हा कायदेशीर शब्द नाही, तर फसवणुकीची एक नवी पद्धत आहे. असे व्हिडीओ कॉल करणारे भामटे स्वतःला पोलीस अधिकारी, उइख, एऊ अधिकारी, कस्टम्स अधिकारी किंवा न्यायाधीश असल्याचं भासवतात. तुम्हाला डिजिटली अटक करण्यात आलं असून तुम्ही फोन कट करु शकत नसल्याचं सांगत ते भीती घालतात. तुमच्यावर वेगवेगळे आरोप असल्याचं सांगत तुमच्याकडून पैसे उकळतात. केंद्रीय गृहमंत्रालयाने याबाबत अधिकृत मार्गदर्शक सूचना जारी केली आहे. अशा पद्धतीने व्हिडीओ कॉलवर अटक किंवा ताबा हा बनावट प्रकार आहे, ते बेकायदेशीर असल्याचं त्यामध्ये म्हटलं आहे. अटक ही नेहमी विधिसंमत प्रक्रिया, लेखी आदेश, वॉरंट आणि प्रत्यक्ष ताब्यात घेण्यानेच होते असं ख४उ च्या सूचनेत स्पष्ट केले आहे.

# भारतीय ज्ञान परंपरेची आधुनिक शिक्षणाला जोड; कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांचे प्रतिपादन

**पुणे । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण प्रक्रियेत विद्यार्थ्याला केंद्रस्थानी ठेवणे अनिवार्य आहे. ज्ञानाचा खजिना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवायचा असेल, तर समृद्ध पारंपरिक शिक्षणासोबत आधुनिक ज्ञानाची सांगड घालणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी केले. विद्यापीठांतर्गत यू.जी.सी. मालवीय मिशन टीचर ट्रेनिंग सेंटरच्या भारतीय ज्ञान प्रणाली या विषयावरील सहा दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामच्या समारोपावेळी ते



बोलत होते. डॉ. गोसावी म्हणाले की, भारताच्या उज्ज्वल भविष्यात युवकांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यांच्यापर्यंत केवळ माहिती नव्हे, तर मूल्य शिक्षण पोहोचवणे हे शिक्षकाचे कर्तव्य आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आणि यूजीसीचे सचिव डॉ. मनीष जोशी यांनी भारतीय ज्ञान प्रणालीच्या उपयुक्ततेवर प्रकाश टाकला. समारोपास प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, एच.आर.डी.सी.चे समन्वयक डॉ. सचिन सुर्वे आदी मान्यवर उपस्थित होते. कवीकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या संस्कृत विभाग प्रमुख डॉ. कलापिनी अगस्ती म्हणाल्या, भारतीय ज्ञान परंपरा हा केवळ अभ्यासाचा विषय नसून तो आचरणात रुजवायचा संस्कार आहे. शिक्षकांनी देशाचा इतिहास आणि संस्कृतीचे सकारात्मक पुनर्लेखन केले, तरच युवा पिढी अधिक सक्षम होईल. मालवीय मिशन टीचर ट्रेनिंग सेंटरचे संचालक डॉ. सुभाष केंद्रे यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी डॉ. आत्माराम आंधळे व डॉ. आर. व्ही. लष्के यांनीही मनोगत व्यक्त केले.

# नीलेश घायवळ टोळीतील फरार गुंड अखेर गजाआड! पुण्याहून बार्शीत लपून बसला

**पुणे । प्रतिनिधी**

कोथरूड गोळीबार प्रकरणात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये म्हणजेच मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आलेल्या टोळीतील फरार आरोपीला वारजे माळवाडी पोलिसांनी अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचं नाव अमोल दत्तात्रय लाखे, वय २७ वर्षे, रा. ईटखेडा, छत्रपती संभाजीनगर असं आहे. लाखे हा सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथे लपून बसला होता. वारजे माळवाडी (छळश्रशीह ऋह्रुरश्र ऋखपस) पोलिसांच्या पथकाने सापळा रचत त्याला बार्शीतून ताब्यात घेतलं.(छळश्रशीह ऋह्रुरश्र ऋखपस)

दरम्यान, या प्रकरणातील मुख्य आरोपी आणि टोळीप्रमुख नीलेश घायवळ अद्याप फरार आहे. तो सध्या ब्रिटनमध्ये असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. त्याच्या प्रत्यार्पणासाठी पुणे पोलिसांनी ब्रिटिश उच्चायुक्तांशी संपर्क साधत पत्रव्यवहार सुरू केला आहे. कोथरूड गोळीबार प्रकरणानंतर



पुणे पोलिसांनी टोळीविरोधात मकोका अंतर्गत कडक कारवाई सुरू केली असून, फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथकं कार्यरत आहेत.

कोथरूड गोळीबार प्रकरणात फरार असलेला गुंड नीलेश घायवळ हा सध्या परदेशात असून, अद्याप त्याला ताब्यात घेण्यात आले नाही. घायवळ हा सध्या ब्रिटनमध्ये असल्याची माहिती मिळाली आहे. त्याच्या प्रत्यार्पणासाठी पुणे पोलिसंनी ब्रिटीश उच्चायुक्तांशी संपर्क पत्रव्यवहार करण्यात आले आहे. खंडणी प्रकरणात घायवळ टोळीविरुद्ध वारजे पोलिसांनी 'मकोका' कायद्यान्वये कारवाई करण्यात आली होती. या प्रकरणात अमोल लाखे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल केल्यानंतर तो पसार झाला होता. लाखे हा बार्शी परिसरात वास्तव्यास असल्याची माहिती तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक संजय नरळे यांना मिळाली. त्यानंतर त्याला सापळा लावून ताब्यात घेण्यात आले. १७ सप्टेंबर रोजी रात्री पावणेबाराला पुण्यातील कोथरूड परिसरामधील मुठेश्वर चौकात घडली होती, तक्रारदार मित्रांसमवेत गप्पा मारत असताना, घायवळ टोळीतील गुंड दुचाकीवरून जात होते. त्यांना जाण्यासाठी रस्ता न दिल्याच्या किरकोळ कारणांवरून भांडणे झाली. त्यातून आरोपींनी धुमाळ यांना मारहाण केली. त्यापैकी एकाने त्यांच्यावर पिस्तुलातून गोळीबार केला. त्यानंतर काही वेळाने आरोपींनी सागर कॉलनी परिसरात वैभव साठे याच्यावर कोयत्याने वार केले. आम्ही या भागाचे भाई आहोत, असे म्हणून आरोपींनी दहशत माजवली, असे तक्रारीत नमूद आहे या घटनेनंतर पोलिसांनी घायवळ टोळीच्या सदस्यांसह टोळीच्या म्होरक्यावरती देखील मकोका अंतर्गत कारवाई केली. यादरम्यानच्या तपासात टोळीप्रमुख निलेश घायवळ फरार असून, तो परदेशात पळून गेला असल्याचं समोर आलं. त्याच्याविरोधात लूक आऊट नोटीस काढली आहे. त्याच्या अटकेसाठी पासपोर्ट रद्द करण्याचा न्यायालयाने आदेश द्यावा, अशी मागणी सरकारी वकिलांनी केली.

cmyk